
# श्री साईलीला



श्रीबाबा दहिहंडीचा खेळ पाहतांना.



मे ) किंमत ६० पैसे ( १९७७

# अनुक्रमणिका मे १९७७


| | | |
|---|---|---|
| १ | श्रीसाईवाक्सुधा | — |
| २ | संपादकीय – आमची मागील पंचावन्न वर्षे | |
| ३ | गाठीभेटी – कलाकार सुधीर दळवी | — सदानंद चेंदवणकर |
| ४ | माझे शिर्डीतील लहानपण | — श्री. गणेश जयदेव चितांबर |
| ५ | शिवलिंग आणि श्रीसाईनाथमहाराज | — श्री. सूर्यकांत गर्जे |
| ६ | राम साई बोलो, शाम साई बोलो | — श्री. गं. रा. भट |
| ७ | बाबांनी लग्न जुळविले | — श्री. अनिल रसाळ |
| ८ | ध्यानी मनी बाबा बाबा | — श्री. श्रीराम सातर्डेकर |
| ९ | वाऱ्यावरचे विचार | — श्री. द. शं. टिपणीस |
| १० | बाबा आपल्या भक्तांना सांभाळतात | — श्री. अनिल पंडित |
| ११ | धार्मिक संगमाचे प्रतिक-श्रीसाई | — श्री. रमेश उदावंत |
| १२ | मी साईभजनी कसा लागलो | — श्री. हेमंत खेडेकर |
| १३ | श्रीबाबांच्या अचाट सामर्थ्याविषयी आलेला एक अनुभव | — श्रीमती विजया सेलुर |
| १४ | वाचकांचा पत्रव्यवहार | — |
| १५ | साई – साई | — सौ. उषा अधिकारी |
| १६ | साईनाथा पावना | — श्री. सुभाषचंद्र वैष्णव |
| १७ | साईभक्तांचा सुदिन | — श्री. उज्वल कुलकर्णी |
| १८ | प्रभो साईनाथा | — श्री. रमेश चव्हाण |
| १९ | साईनामाचा महिमा | — श्री. रामदास जोशी |
| २० | मेरा भी नाम लिखना | — श्री. जयवंत कुलकर्णी |
| २१ | प्रेमांकुर | — श्री. रा. द. महाजन |
| २२ | साईध्यान | — श्री. रघुनाथ सांडभोर |
| २३ | ब्रह्मानंद देई साई | — श्री. प्र. अ. पुराणिक |
| २४ | श्रीसाईनाथाची आरती | — श्री. रमाकांत पंडित |
| २५ | तू उमगला नसता तर | — दे. शि. उधलकर |
| २६ | अथ श्रीसाईनाथ कवचम् | — श्री. ल. न. तथा बापूजी रणदिवे बी. ए. |
| २७ | शिर्डी वृत्त | — — |

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



## श्री सा ई वा क्सु धा

त्रिप्रकार शिष्य असती ।
उत्तम मध्यम अधम वृत्ति ।
प्रकार प्रत्येकीं अति संकलिती
अभिव्यक्तीस आणितों ॥ १८६ ॥

न सांगतां अभीष्ट जाणणें
जाणतांच सेवा करूं लागणें ।
प्रत्यक्ष आज्ञेलागीं न खोळंबणें ।
जाणें 'उत्तमशिष्य' तो ॥ १८७ ॥

गुरूनें आज्ञापिता मानणें ।
अक्षरें अक्षर प्रतिपाळणें ।
कार्यांतरी न विलंबणें ।
जाणें 'मध्यम शिष्य' तो ॥ १८८ ॥

गुरूनें आज्ञा करीत राहणें ।
करूं करूं म्हणतचि जाणें ।
प्रतिपदीं प्रमाद करणें ।
जाणा 'अधमशिष्य' तो ॥ १८९ ॥

परम वैराग्य नाही अंतरीं ।
नित्यानित्य विवेक न करी ।
कैंची गुरुकृपा तयावरी ।
जन्म जरी वालविला ॥ १९७ ॥

—श्रीसाईसच्चरित्–अध्याय २३ वा

# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५६ वे ] मे ७७ [ अंक २

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक,**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )

वार्षिक वर्गणी रु. ६–०० ( ट. ख. सह )
किरकोळ अंक ६० पैसे फक्त.

: कार्यालय :
"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४–बी,
डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.
पिन : ४०००१४
दूरध्वनी : ४४ ३२ ६१

# संपादकीय—

## स. न. वि. वि.

### आमची मागील पंचावन्न वर्षे—

श्रीसाईलीला मासिकाने नुकतेच पंचावन्नाव्या वर्षांत पदार्पण केलेले आहे. गतवर्षी आम्ही श्रीसाईलीलेच्या वाटचालीचा थोडक्यात आढावा घेतला होता. त्यामधून श्रीसाईलीलेच्या जीवनातील काही महत्त्वाच्या टप्प्यांचा उल्लेख केलेला होता. आमच्या वाचकाना माहितच असेल की श्रीसाईलीलेचा अगदी पहिला अंक चैत्र गुढीपाडवा शके १८४५ म्हणजे इ. स. १९२३ साली प्रसिद्ध झाला होता. म्हणजे श्रीबाबांच्या महानिर्वाणानंतर सुमारे साडेचार वर्षांनी.

शिर्डी येथे श्रीसाईबाबांचे जे उत्सव धूमधडाक्याने साजरे होतात त्यामध्ये रामनवमी व श्रीबाबांची पुण्यतिथी हे दोन्ही उत्सव महत्त्वाचे आहेत. विशेषतः रामनवमी चैत्र महिन्यात येते व चैत्र हा हिंदु पंचांगाप्रमाणे वर्षाचा अगदी पहिला महिना तेव्हा या पहिल्या महिन्यापासूनच श्रीबाबांची स्मृती जागती ठेवण्याच्या उद्देशाने भक्त मंडळींनी नववर्षदिनापासून म्हणजे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर श्रीसाईलीलेचा प्रथमांक प्रसिद्ध केला ही वस्तुस्थिती आहे.

श्रीसाईलीलेचा अगदी पहिला अंक किती पानांचा होता आहे माहित ? अवघा ३२ पानांचा ! आणि श्री. लक्ष्मण गणेश महाजनी यांचे नाव संपादक म्हणून त्यावर झळकत होते, श्रीसाईबाबांच्या या मासिकाच्या पहिल्या अंकाचे संपादक श्री. महाजनी हे खरोखरीच भाग्यवान म्हणायचे. या अंकावर किंमत अजिबात छापलेली नव्हती. तो एक नमुना अंक म्हणून होता व परिचित ज्ञात साईभक्तांकडे तो विनामूल्य पाठविला गेला होता. या अंकाच्या पान क्रमांक दोनवर एक टीप दिलेली होती. आपल्याकडे पहिला अंक पाठविलेला आहे. विनंती अशी की या मासिकाचे वर्गणीदार पुढच्या अंकापासून कृपया व्हावे. मासिकाची वार्षिक वर्गणी अवघी तीन रुपये सहा आणे टपालहंशिलासह आहे. भक्ताना त्याचवेळी कळविण्यात आलेले होते की पुढील अंक व्ही. पी. पी. ने येईल तो अवश्य सोडवून घ्यावा आणि अंकाचे सभासद व्हावयाचेच नसेल तर तसे संपादकांना लगेच कळवावे म्हणजे संस्थानला नाहक टपालहंशिलाचा बोजा पडणार नाही. या पहिल्या अंकातले संपादकीय मोठे वैशिष्टयपूर्ण होते. सध्याच्या वाचकांसाठी ते पुन्हा आपल्यासमोर जसेच्या तसेच ठेवित आहोत—

# श्रीसाईलीला मासिक

## वर्ष १ चैत्र शके १८४५ (१९२३) अंक पहिला

या मासिक पुस्तकाचा उद्देश त्याच्या नावावरून व्यक्त होत आहे. शिरडीचे श्रीसाई महाराजांचे भक्त असंख्य असून ते ठिकठिकाणी पसरले आहेत. त्यांना निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या तऱ्हेचे अनुभव महाराजांनी दिलेले आहेत. इतकेच नव्हे तर महाराजांनी आपल्या देहावसानानंतरसुद्धा अनुभव देण्याचे चालू ठेवले आहे. किंबहुना ज्यांना महाराजांच्या देहाचे प्रत्यक्ष दर्शन घडलेले नाही त्यांनासुद्धा अनुभव येत आहेत. थोडक्यात म्हणावयाचे म्हणजे महाराजांचे अनुभव अश्रूतपूर्व, अतर्क्य आणि अनेक आहेत व त्यांच्या अष्टकातील खालील श्लोकाची सत्यता सर्वांना पटवीत चालले आहेत.

अनेका श्रुतातर्क्य लीला विलासै : ।
समा विष्कृतेशा न भास्वत प्रभावम् ॥
अहं भावहीनो प्रसन्नात्म भावम् ।
नमामीश्वरं सद्गुरू साईनाथम् ॥ १ ॥

महाराजांच्या सर्व लीलांचा एके ठिकाणी संग्रह होणे शक्य नाही. पण शक्य असेल तेवढा त्यांच्या लीलांचा व त्यांच्या अमूल्य बोधवचनांचा संग्रह करावा या हेतूने हे मासिक पुस्तक काढले आहे. भावार्थ रामायणात श्रीरामचंद्राला पार्वतीने "तू सर्वज्ञ असताना भ्रांतपणाचे अवलंबन करून तृणपाषाणाना आलिंगन का देतोस ?" असा प्रश्न केला असता श्रीरामचंद्रांनी जे शब्द उच्चारले आहेत तेच महाराजांना लागू आहेत. श्रीरामचंद्र म्हणाले—

भक्त उद्धारावया कारणे । रडणे पडणे अडखळणे ।
पर्वतों पर्वतीं धावणे । आणि आलिंगणे वृक्षांसी ॥
उमे जाण तू निश्चित । माझे पाऊल न पडे व्यर्थ ।
जाणे सदाशिव समर्थ । तुझा भावार्थ तो नाही ॥

हे शब्द सर्वस्वी महाराजांस लागू आहेत. त्यांचा एकूण एक शब्द व एकूण एक लीला केवळ भक्तांच्या उद्धारासाठी होती; व त्यांचे एक पाऊलसुद्धा व्यर्थ पडत नव्हते. म्हणून त्या लीलांचा व शब्दांचा संग्रह भक्तांनाच नव्हे तर सर्व जनतेला हितकारी होईल अशी आमची खात्री आहे.

असा संग्रह करण्याचा थोडासा प्रयत्न झालेला आहे व तो या मासिकात "महाराजांचे अनुभव" व "श्री साईसच्चरित" या मथळ्याखाली येईल. यापैकी श्रीसाईसच्चरित पद्यात्मक म्हणजे ओळीबद्द रचले गेले आहे व त्याची म्हणजे

श्रीसाईसच्चरिताची सुरुवात महाराज देहधारी असताना त्यांची आज्ञा घेऊन झाली होती. "महाराजांचे अनुभव" या मथळ्याखाली निरनिराळ्या भक्तांकडून जे अनुभव लिहून येतील त्यांचा संग्रह करण्याचे योजिले आहे. असे बरेचसे अनुभव आमच्या संग्रहात आज आहेत, ते या मथळ्याखाली छापले जातील. त्यात काही चुका असल्यास त्या त्या भक्ताकडून दुरुस्ती लिहून आल्यास आम्ही आनंदाने प्रसिद्ध करू. तसेच महाराजांचे भक्तांकडून जे जे अनुभव लिहून येतील त्यालाही सवडीप्रमाणे शक्य तितके स्थळ या मासिकात देऊ. भक्तांचे अनुभव छापण्यासाठीच हे मासिक असल्यामुळे जे अनुभव लिहून येतील तिकडे पूर्ण लक्ष दिले जाईल हे सांगणे नकोच.

समर्थांनी कोणास काही गुप्त रीतीने सांगितले असेल तर ते या ग्रंथात परिस्फुट होण्याचा संभवच नाही. पण त्यांनी उघड दरबारात सर्वांसमक्ष कुणा एकास उद्देशून जरी काही सांगितले असले तरी ते सर्वांच्या हिताचे असल्यामुळे ती सर्वांची सामाईक कमाई आहे असे सर्व साईभक्त समजत असले पाहिजेत अशी समजूत आहे; आणि म्हणूनच त्यांनी आपले अनुभव लिहून पाठवावे अशी आमची प्रत्येक भक्तास आग्रहाची विनंती आहे.

सारांश ही सरस्वतींची सेवा आणि ती परमदयाळू श्रीसाई माऊलीचे इच्छेने आणि आशीर्वादाने घडत आहे. अर्थात त्या माऊलीची आपल्या भक्तांना वेळोवेळी आठवण होत रहावी हेच या सेवेचे ध्येय आहे."

वाचकहो, वरील संपादकीयावरून असे दिसून येईल की श्रीसाईलीला मासिक सुरू करण्याचे दोन मुख्य उद्देश्य होते.

१) श्रीसाईसच्चरिताचे प्रकाशन

२) श्रीसाईभक्तांना आलेले श्रीबाबांचे अनुभव

आज श्रीसाईसच्चरित पुस्तक पोथी रूपाने प्रत्येक साईभक्ताचे हाती आहे त्यामुळे श्रीसाईसच्चरिताच्या प्रसिद्धी संबंधाने श्रीसाईलीलेत आता काही नको. कारण श्रीसाईसच्चरिताच्या इंग्रजी व बहुतेक सर्व भाषातून आवृत्त्या उपलब्ध आहेत. तेव्हा दुसऱ्या प्रश्नाकडे मात्र तूर्त लक्ष देणे आवश्यक आहे. श्रीसाईबाबा सर्व शक्तिमान विभूती आहेत. त्यांचा प्रभाव सर्वत्र आहे, आणि म्हणूनच की काय त्यांच्या लीला अगाध आहेत. त्यांना शेवट असा कधीच नाही. जसजशी साईभक्तांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे तसतशा बाबांच्या लीला पण अनंतपटीने वाढत आहेत. जगाच्या कोनाकोपऱ्यातून भाविक आपल्या स्वतःस येणारे बाबांचे अनुभव आमचेकडे पाठवीत आहेत. त्यांचा

वर्षाव जणू आमच्यावर होत आहे. यातले निवडक अनुभव आम्ही साईलीलेतून प्रसिद्ध करीत असतो व यापुढेही करू. दिवाळी अंक तर बाबांच्या या अनुभवानेच अगदी गच्च भरलेला असतो व तो वाचक अतिशय भक्तिभावाने व आधाशीपणाने वाचतात. याचाच अर्थ असा की संपादक महाशयानी अगदी पहिल्या अंकात दिलेले अभिवचन आजही आम्ही अगदी तंतोतंत पाळीत आहोत.

श्रीसाईभक्तांच्या वाढत्या संख्येप्रमाणे श्रीसाईलीला वाचकांची संस्था पण वाढत आहे. आणि गेल्या चार वर्षांत तर श्रीसाईलीला वर्गणीदारांची संख्याही दुप्पट झाली आहे. इंग्रजी आणि मराठी दोन्ही आवृत्तींच्या वर्गणीदारांमध्ये सारखी भर पडत आहे. श्रीसाईलीला लेखक-कवींचा दरवर्षी भरणाऱ्या मेळाव्यामुळेही अंकाच्या वर्गणीदारांच्या संख्येत भर पडण्यास मदतच झाली आहे. काही भक्तमंडळी तर मासिकाचा प्रसार-प्रचार स्वयंस्फूर्तीने करीत असतात. आम्हाला मिळत असलेल्या या उत्तेजनामुळे आम्ही साईलीलेला सहाय्य करणाऱ्या सर्व ज्ञात व अज्ञात अशा हितचिंतकाचे मनःपूर्वक आभारी आहोत. यापुढेही आम्ही या सर्वांचे सहाय्य अपेक्षीत आहोत व त्यांच्या या अमोल सहकार्यामुळे श्रीसाईलीलेचा ध्वज त्रिखंडात फडकत राहील अशी आशा करीत आहोत.

# श्री. वसंतदादांचे अभिनंदन

● महाराष्ट्र विधिमंडळ कॉंग्रेसपक्षाच्या नेतेपदी महाराष्ट्रातील एक ज्येष्ठनेते श्री वसंतदादा पाटील यांची शनि. ता. १६ एप्रिल १९७७ रोजी निवड झाली आहे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी ता. १७ रोजी झाला. श्री. दादांच्या या सुयशाबद्दल आम्ही त्यांचे अभिनंदन करतो.

श्री. वसंतदादा राजकारणी नेते असे कधीच नव्हते. ते समाजात राहून समाजा-साठी जिद्दीने, ईर्षेने व तळमळीने कार्य करणारे निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. विधायक कार्याकडे त्यांचा कल प्रारंभापासूनच आहे. दादा आज मुख्यमंत्री झाले असले तरी त्यांचा पिंड गोरगरीबांच्या उन्नतीसाठी रचनात्मक, विधायक कार्यात रमणारा असा आहे. आपल्या लोकांशी विविध विषयांवर चर्चा करावी, त्यांची दुःखे, गाऱ्हाणी सोशीकपणे, आस्थेवाईकपणे ऐकून घ्यावी, त्यांना शक्य तेवढी जास्तीत जास्त मदत करावी हा त्यांचा मनोधर्म आहे. महाराष्ट्राला दादांचे नेतृत्व निश्चित लाभदायक ठरेल यात तिळमात्र शंका नाही. श्री. दादांच्या कार्याला व त्यांच्या नूतन मंत्रीमंडळाला श्रीसाईबाबा संस्थानच्या हार्दीक शुभेच्छा.

# श्रीसाईबाबांची हुबेहूब भूमिका वठविणारे तरुण कलाकार

## श्री. सुधीर दळवी

● सदानंद चेंदवणकर



●'शिर्डी-के साईबाबा' हा सुंदर भक्तिरस प्रधान व बाबांच्या अनेक लीला चित्रित करणारा सुंदर हिंदी चित्रपट गेल्या महिन्यात मुंबापुरीत अनेक चित्रपटगृहातून झळकला. श्री. गुलशन राय हे त्या चित्रपटाचे खरेखुरे मालक. श्री. अशोक भूषण यांचे दिग्दर्शन लाभलेला व श्री. पांडुरंग दिक्षितांनी उत्कृष्ट मार्गदर्शन केलेल्या या चित्रपटाचे संवाद श्री. मनोजकुमार यांनी लिहिलेले आहेत. लोणावळयाच्या सरला चॅरिटिज ट्रस्ट करिता काढलेला हा रंगीन बोलपट सर्व साईभक्तांना आवडला यात शंकाच नाही. या बोलपटात श्रीसाईबाबांची सुयोग्य भूमिका केलेले तरुण कलाकार आहेत श्री. सुधीर प्रभाकर दळवी.

श्री. दळवी कुटुंब हे मूळचे पिंपळगाव बसवंतचे. श्री. सुधीर यांचे आजोबा चांगले वकील होते. सुधीरपंतांच्या मातोश्रींचे नाव इंदूप्रभा, वडील - प्रभाकरपंत हे व्ही. जे. टी. आय मधून कापड उद्योगधंद्यासंबंधीचा 'एल. टी. एम' हा डिप्लोमा घेऊन बाहेर पडले व पुढे ते सरकारी कापड उद्योगधंद्यात इन्स्पेक्टर म्हणून नोकरीस राहिले. पुढे सेवानिवृत्तीनंतर त्यांनी एक छापखाना ठाणे येथे घेतला व आज श्री. सुधीर आपल्या मालकीच्या छापखान्याचा विकास करीत असून त्याबरोबरच आपल्या अंगच्या कलात्मक गुणांची नाट्य व चित्रपटसृष्टीत वावरून जोपासना करीत आहेत.

श्री. सुधीर यांचा जन्म ठाणे येथे झाला. वडिलांच्या होणाऱ्या नोकरीच्या सारख्या बदलीमुळे छोट्या सुधीर यांचे शिक्षण पिंपळगाव, कलकत्ता, ठाणे व दादर येथे झाले ते ठाण्याच्या एम. एच. हायस्कूलचे व दादरच्या राजा शिवाजी विद्यालयाचे विद्यार्थी. एस. एस. सी. उत्तीर्ण झाल्यावर सुधीर आर्किटेक्चर कोर्सला गेले. त्याबरोबरच 'इंटिरियर डेकोरेशन'चा (आतील सजावट) कोर्सही त्यांनी पदरात पाडला. जुहू चर्च जवळील श्री. बलराज सहानींच्या बंगल्याची आतील सजावट त्यांनीच केलेली आहे.

श्री. सुधीरना नाटक-चित्रपटातून कामे करण्याची भारी हौस! सुरुवातीला ते चित्रपटातच होते. '२७ डाऊन' श्री. अवतार कौल यांच्या चित्रात त्यांनी लंबूकाकाची भूमिका केलेली आहे. त्यांची पहिली भूमिका असलेला हाच चित्रपट. १९७२ साली तो प्रकाशित झाला. या चित्रपटाला राष्ट्रीय पारितोषिक तर मिळालेच पण स्वित्झर्लंड व एडिंबरो येथे झालेल्या पिक्चर फेस्टिव्हल्समधेसुद्धा या चित्रपटाला पुरस्कार लाभला. यानंतर 'बिटनेस' व शमशाद प्रॉडक्शन्सच्या 'असंभव' या चित्रातून त्यांनी साजेशा भूमिका केल्या.

चित्रपटसृष्टीबरोबरच रंगशारदेच्या दरबारातूनसुद्धा ते वावरू लागले. 'वीज म्हणाली धरतीला,' 'तो राजहंस एक,' 'संत तुकाराम' या नाटकातून त्यांनी यशस्वी भूमिका केल्या आहेत. श्रीकांत मोघे यांच्या 'मिर्झा राजे जयसिंग' (गरुडझेप) या नाट्यप्रयोगाचे वेळी भूमिका करीत असताना सुप्रसिद्ध दिग्दर्शक श्री. पांडुरंग दिक्षित यांनी त्यांना पाहिले; आणि मग या कलाकाराला नजिकच्या काळात एखादी सुंदर भूमिका आपण करायला सांगावी असे त्यांना वाटले. कारण त्यावेळी त्यांच्यासमोर श्रीसाईबाबांच्या एखाद्या चित्रपटाच्या विषयीचा विषय होता; आणि योगायोगाने मनोजकुमारने जेव्हा या विषयावर संवादच लिहिला तेव्हा श्री. पांडुरंग दिक्षित यांनी श्री. सुधीरना साईबाबांची भूमिका करण्याचा आग्रह धरला. तो त्यांनी मान्य केला.

येथवर मात्र सुधीरना श्रीसाईबाबांच्याविषयी जवळजवळ काहीच माहिती नव्हती. पण बाबांची भूमिका जेव्हा त्यांनी करावयास सुरुवात केली तेव्हा त्यांनी प्रथम श्रीसाईसच्चरिताचे वाचन केले. तेव्हा बाबा म्हणजे कोण? त्यांनी मानवजातीचे कल्याणासाठी काय काय केले. त्यांच्या समकालीन अशा व्यक्ती इत्यादींबद्दल त्यांना भरपूर माहिती झाली व सहाजिकच त्यांचे हात बाबांच्या मूर्तीपुढे जुळू लागले. बाबांची भूमिका वठविताना बाबा कसे काय बोलत, चालत याबद्दलची सर्व ती माहिती त्यांना श्री. पांडुरंग दिक्षितांचे वयोवृद्ध व बाबांना प्रत्यक्ष पाहिलेले वडील यांनी उत्तम प्रकारे समजावून दिली. याचा त्यांना खूपखूप उपयोग होऊन आपली भूमिका

समरसतेने वठविता आली. बाबा अजानुबाहू होते व चालताना ते आपल्या उभय हातांचे पंजे काहीसे विस्फारीत असत हा बारकावा पण सुधीरनी वगळला नाही. बाबांच्यासारखी हुबेहूब चाल त्यांनी चित्रात केली आहे. या भूमिकेला साजेशा अशा आवाजानेही त्यांना साथ दिली आहे. २० मे १९७६ ला या चित्रपटाच्या प्रत्यक्ष चित्रीकरणाला सुरुवात झाली; व फेब्रुवारी १९७७ मध्ये हे चित्र पूर्ण झाले. चित्रीकरण बाघोली व पुण्यापासून १५ मैलावर असलेल्या केसनन गावी व बोरिवलीच्या कोरा केंद्रात झालेले आहे. शिर्डीला नाही हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे.

चित्रपटात काम केल्यामुळे म्हणा की आणखीन कोणत्या कारणामुळे म्हणे श्री सुधीर साईभक्त झालेले आहेत. साईसच्चरित्राच्या वाचनामुळे मनःशांती मिळाली असे ते सांगतात. चित्रपट झळकल्यावर ते कुटुंबासमवेत शिर्डीलाही जाऊन आले आणि आपल्याला धन्यता वाटली असे उद्‌गार त्यांनी काढले. आपल्या अंगी कलागुण असूनसुद्धा आपल्याला वाव मिळत नाही यामुळे आपण बेचैन झालो होतो पण साईभक्त बनल्यामुळे ती बेचैनी नष्ट झाली आहे. इतकेच नव्हे तर आपल्या सौभाग्यवतीच्या तब्येतीलासुद्धा चांगला आराम वाटू लागला आहे. श्री. सुधीर यांचा विवाह १९७२ साली झाला. त्यांच्या पत्नी पूर्वाश्रमीच्या कु. सुहासिनी डोंगरे. त्यांचे वडील मुंबईतील शिवडीच्या स्वान मिलमधे स्पिनिंग मास्तर होते. सौ. दळवी या विल्सन कॉलेजच्या विद्यार्थीनी. एम. ए. पर्यंतचे शिक्षण त्यांनी घेतलेले आहे. दळवी दांपत्यात कुमार रोहित याने भर घातली. त्याच्यावर उत्तम प्रकारचे संस्कार करण्यात दोघेही गर्क असतात. श्री. सुधीरना नाटकातून भूमिका करण्याची आवड आहे. ' शिरडी के साईबाबा ' या चित्रपटानंतर लगेच त्यांनी प्रणाम फिल्मसच्या ' करफ्यु ' व ' शिकस्त ' या दोन चित्राच्या करारावरपण सह्या केल्या आहेत. प्रवासाची त्यांना आवड आहे आणि आपल्या इष्टमित्र मंडळीना व थोरामोठ्याना भेटण्याचा त्यांना छंद आहे. 'शिरडी के साईबाबा' हा सुधीरांची साईची भूमिका असलेला चित्रपट त्यांच्या अनेक मित्रांनी व चाहत्यांनी पाहिला व जे साईभक्त नव्हते ते साईभक्त झाले व ज्यांना शिर्डी माहित नव्हती ते लोक शिर्डीला पण लगेच जाऊन आले. विजय ढोलकिया हा सुधीरांचा एक मित्र तर या भूमिकेवर इतका खूष झाला की तो लगेच शिरडीला पण जाऊन आला व आता बाबांचा भक्त बनला आहे; आणि सुधीर तर काय घराच्या बाहेर पडताना बाबांच्या प्रतिमेला वंदन केल्याशिवाय निघतच नाहीत. श्रीसाईबाबा नजिकच्या काळात सुधीरांच्या जीवनात कलेच्या दृष्टीने क्रांतीकारक बदल करोत हीच साईचरणी प्रार्थना. ●

# माझे शिर्डीतील लहानपण

—श्री. गणेश जयदेव चितांबर
'आकांक्षा', सर्वोदय हौसिंग सोसायटी, अहमदनगर.

## बाबांच्या हाताने रोज प्रसाद मिळे



● **माझा** जन्म शिर्डीचा. माझे वडील कै. दाजी वामन चितांबर हे शिर्डी येथे सुमारे १४ वर्षापेक्षा जास्त तेथील त्यावेळच्या लोकल बोर्डाच्या प्राथमिक शाळेत शिक्षक होते व सेवानिवृत्ति नंतरही बरीच वर्षे ते शिर्डीतच राहिले. चावडीकडे तोंड करून उभे राहिले की उजव्या हातास (पूर्वेस) जे घर मध्येच एकटेच दिसते त्या घरात माझा जन्म २२–८–१९१४ रोजी झाला. अगदी पहिल्या २–२॥ वर्षापर्यंतचे मला सांगता येत नाही. परंतु ३ रे व ४ थे ह्या वर्षी बाबांच्याजवळ लहान मुले आजोबाजवळ बसतात तशाप्रकारे मी दिवसाचा खूपच वेळ बसत असे. लहान नातवंडे घरात आजोबांशी वागतात तसाच मी वागे. दुपारची आरती झाली की बाबा मशिदीतील पायरीवर उभे राहून नैवेद्याची सर्व ताटे सर्व उपस्थितांना वाटून टाकीत. सर्व अन्न गोरगरिबांना ते स्वतः देत. एका ताटात बर्फीच्या मध्यम आकाराच्या मुदी असत. त्यांतील एक छोटी मूद सर्वप्रथम मला मिळे. मला खूप आनंद वाटे. मी ती घरी आईजवळ देई. आम्ही सर्वजण थोडा थोडा (कण–कण–हरबऱ्याएवढा) प्रसाद घेत असू व बाकीचा फडक्यात बांधून ठेवला जाई. परगावचे जे कोणी भक्त दिवसभरात साईबाबांच्या दर्शनास येत त्यांना आरतीच्या वेळचा प्रसाद हवा

असल्यास ते आमच्या घरी येत. त्यांना त्यातून प्रसाद माझी आई देत असे. वडील शाळेत गेलेले असत.

एके दिवशी रात्री ८–९ वाजेपर्यंत मी बाबांचे जवळच बसलो. बाबांनी रस्त्याने जाणाऱ्या एका माणसास हाक मारली व मला घरी पोचवण्यास सांगितले. एके दिवशी माझी आई मला नेण्यास आली. मी लवकर जाईना. म्हणून आईने मला एक रपाटा मारला. ती तेवढ्यात मला घेऊन २-५ पावले गेली होती. बाबांनी तिला काहीतरी सांगितले. मला त्यावेळी ते काही समजले नाही व ही गोष्ट मी विसरूनही गेलो.

बाबा पंचत्वात विलीन झाले. त्या दिवशी दसरा होता. बाबांची अन्त्य यात्रा मी पाहिली. चार चाकांच्या वाहनावरून अर्धवर्तुळाकार आच्छादन घालून त्यांचा देह मिरवणुकीने मशिदीतून ( द्वारकामाई ) आमच्या घरावरून, गावातून संपूर्ण वळसा घालून समाधिमंदिराकडे नेताना मी पाहिला. त्यावेळी ते देऊळ ( आताचे समाधिमंदिर ) पूर्णपणे बांधून झालेले नव्हते. त्याचे बांधकाम नंतर होत असताना मी पाहिले आहे. त्यावेळच्या बांधकामात आता खूपच वाढ झालेली आहे. ( पूर्वीचे मंदिर व आजचे मंदिर ह्याचे वर्णन स्वतंत्रपणे करणे इष्ट होईल )

काही दिवसांनी आम्ही घर बदलले, व तेही घर पुन्हा बदलले आणि आता ज्या ठिकाणी लिंबवृक्ष व बाबांच्या गुरूंच्या पादुका आहेत त्या जागेत त्या वृक्षाच्या पूर्वेस व पश्चिमेस समोरासमोर घरे होती त्यापैकी पूर्वेकडील घरात आम्ही ( माझे आई-वडील, मी व माझे भाऊ ) राहण्यास गेलो. घराच्या दारातून बाहेर पडलो की उजव्या हातासच तो लिंबवृक्ष व त्याखाली पादुका. मधे अंगण व समोरच्या जागेत कै. नानूमामा जाखडी (आता श्री. दिगंबर जाखडी त्यांचे वडील), नानूमामांच्या मातोश्री (आजी) व त्यांच्या पत्नी रहात व एका खोलीत कै. दादा केळकर रहात.

## बाबांच्या शब्दांचा प्रत्यय

एकदा माझ्या नाकाच्या उजव्या बाजूच्या हाडावर ( डोळ्याच्या खोबणीच्या खाली व नाकपुडीच्या वर ) मस आले, आणि ते वाढतच राहिले. नेमके त्यावेळी मुंबईचे एक डॉक्टर हवा पालटण्यासाठी शिर्डीस येऊन राहिले होते. ते रोज सायंकाळी लेंडीनाला ओलांडून कोपरगावच्या दिशेने मैल–दीड मैल फिरावयास जात. का कोणास ठाऊक पण ते रोज मला फिरावयास घेऊन जात. विशिष्ट वेळी ते घरासमोर येऊन मला हाक मारीत. " अहो चितांबर चला " मी खूपच लहान. ते

मला अहो जाहो म्हणत याचे मला आश्चर्य वाटे. मी माझ्या मेहुण्यांकडे श्री. राजाराम धोंडो देशमुख, २ वर्षे संगमनेरला पेटिट हायस्कूलमध्ये शिकलो. परंतु त्यांची बदली राहूरीस झाली व तेथे इंग्रजी शाळा नसल्याने मी वडिलांकडे शिर्डीस आलो होतो. माझ्या आईने मला विचारले, " हे कोण आहेत ? " मला काहीच माहीत नव्हते. मी त्यांना (नंतर) विचारले. तेव्हा ते डॉक्टर आहेत असे समजले. दुसऱ्या दिवशी आईने मला सांगितले, " तुझ्या नाकाचे त्यांना दाखवून यांना विचार तरी " म्हणून मी दुसऱ्या दिवशी त्यांना विचारले. त्यांनी सांगितले की " डोळ्यातील अश्रू नाकातून बाहेर पडतात. परंतु त्या ठिकाणी आत एक पिशवी असते ती आतून सुजली आहे. त्या भागाचे ऑपरेशन करावे लागेल. " मी आपले एवढे आईला फिरून परत आल्यावर सांगितले. मला आईने पुन्हा सांगितले, " अरे, मग त्यांना विचार की हे ऑपरेशन कोठे होईल ? किती खर्च येईल ? " त्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी मी विचारले. त्यावर डॉक्टर म्हणाले, " हे ऑपरेशन कठीण असते ते मुंबईसच करावे लागेल व त्याला ७०–७५ रु. खर्च येईल आणि हे लवकर करायला हवं " हे सर्व मी पुन्हा आईला सांगितले. तो काळ १९२६ किंवा १९२७ चा असावा. त्याकाळी आजच्या इतके दवाखाने व इतके तज्ञ डॉक्टर्स जिल्ह्याच्या ठिकाणीही नसत. निदान आम्हाला शिर्डीत हे माहीत नव्हते.

माझी आई भोळी भाबडी. तिची व माझ्या वडिलांचीही साईबाबांवर नितांत श्रद्धा. माझ्या नाकास हे ' मस ' आल्यापासून आई अण्णांना ( आम्ही वडिलांना अण्णा म्हणत असू ) सांगे, " अहो, एकदा हा बाबांजवळ खूप वेळ बसला रात्र झाली. मी त्याला आणायला गेले तो येईना म्हणून त्याला बळेच घेऊन निघाले व त्याला एक चापट मारली. तो रडू लागला तेव्हा बाबांनी मला बोलावून सांगितलं, " हे पहा हा मागल्या जन्मीचा तुझा बाप आहे आणि माझा मित्र आहे. ह्याला पुन्हा मारू नकोस " माझ्या वडलांचं नाव अप्पा होतं त्याचं नाव तरी ठेवून पहा. " शेवटी डॉक्टरांचं मत जेव्हा त्यांच्या कानी गेलं तेव्हा एके दिवशी सायंकाळी देवा-पुढे दिवा लावल्यावर साईबाबांच्या फोटोला उदबत्ती ओवाळून साईबाबांची उदी माझ्या वडलांनी मला लावली व साईबाबांना सांगितलं, " तुमच्या सांगण्याप्रमाणं ह्याचं नाव अप्पा ठेवलं " आणि ह्या नावाने वाड्यातील सर्वांना साखर वाटली. विशेष आश्चर्याची गोष्ट अशी की त्या दिवसापासून ते ' मस ' ओसरू लागले. आणि तिसरे दिवशी संपूर्णपणे बरे झाले. ते पूर्णपणे बसले. होते की नव्हते इतके. पुन्हा ते आले नाही व काहीही त्रास झाला नाही. हा स्वानुभव आहे. ही अनु-भूति आहे. अनुभविलेले सत्य आहे. बाबांच्या शब्दांचा प्रत्यय आहे.

## विनम्र भक्ती हवी – दंभ नको

असे आपले अनुभव इतरांना सांगू नयेत कारण स्वतःचे स्तोम त्यात माजवतो असे मला वाटते. शिवाय अशा प्रसंगाचे व अशासारख्या अनुभवांचे वारंवार कथन करून आपल्याच मनात " आपल्यावर बाबांचे ( देवाचे ) प्रेम आहे " असा दूराभिमान निर्माण होणं हेही अनिष्टच. भक्ति आणि श्रद्धा ह्या गोष्टींचे स्तोम व थोतांड होता कामा नये. सेवाभाव व विनम्रपणा नष्ट झाल्यास भक्तीची खरी प्रेरणा नष्ट होऊन दंभ व अहंभाव ह्यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते, आणि तसे झाले तर भक्तिमार्गातून अध्यात्मिक प्रवृत्तीकडे जाण्याचे सर्व मार्ग खुंटतात. (माझा ह्या बाबतीत व्यासंग नाही. )

साईबाबा व त्यांचे तत्कालीन भक्त ह्यांनी माझ्या जीवनाची फार मोठी जडण–घडण केली आहे तिचे वर्णन येथे नको. त्यासाठी बरीच पृष्ठें लागतील.

आत्मप्रौढीसाठी मी वरील अनुभव सांगितलेला नाही. केवळ साईलीलेच्या तृतीय लेखक व कवि संमेलनाच्या वेळी मी उपस्थित असताना साईभक्तांच्या आग्रहामुळे, साईबाबांना पाहिलेल्या व्यक्तींचे अनुभव ऐकण्याची त्यांच्या भक्तियुक्त तळमळीतून त्यांनी केलेल्या कळकळीच्या विनंतीचा हे कथन हा परिपाक आहे. हे केवळ साईभक्तांच्या सेवेसाठी.

................

# शिवलिंग आणि श्रीसाईनाथ महाराज

—श्री. सूर्यकांत मा. गर्जे
८० शिवाजीनगर, पुणे ५.

● परवाची गोष्ट. पुण्यातील एक थोर साईभक्त श्री. काटे महाराज आमचे घरी आले होते. दोन साईभक्त एकत्र आल्यावर श्रीबाबांच्याबद्दल चर्चा न होईल तरच नवल. नेमके तेच घडले. श्रीबाबांची महती गात असताना तीन-चार तास कसे गेले हे समजलेसुद्धा नाही. श्री. काटे महाराज श्रीबाबांचे परमभक्त व एकनिष्ठ उपासक असल्याने श्रीबाबांच्या बाबत कथन करीत असलेल्या प्रवचनात अधिकारवाणी होती. श्रीबाबांच्या छोट्या छोट्या कृती आणि प्रसंगातून किती महान अर्थ सामावलेला आहे याचे यथोचित वर्णन साध्या सोप्या शब्दातून व्यतीत केले जात होते. गप्पांच्या ओघात शिवलिंगावर सखोल चर्चा झाली.

नुकत्याच झालेल्या महाशिवरात्रीच्या दिवशी श्री. काटे महाराजांनी आपल्या घरातील "साई–दरबारात" साई भक्ताना एक हजार एक शिवलिंगांचे महान् आणि मंगल दर्शन घडविले. दर्शन आणि प्रसादाचा लाभ शेकडो भक्तांनी घेतला. सव्वा पाच किलो भाराची शाडूची माती, दूध, दही, मध, साखर यांचे मिश्रण करून, दोन-तीन दिवस खपून श्री. काटे महाराजांनी एकट्याने एक हजार एक शिवलिंगे तयार केली. वैशिष्ठ्य म्हणजे शिवलींग तयार करीत असतांना ती कुणाच्याही दृष्टीस पडणार नाहीत याची दक्षता त्यांनी घेतली व महाशिवरात्रीच्या दिवशी यथासांग पूजा अर्चा करून शिवलिंगांचे भव्य आणि दिव्य दर्शन असंख्य भक्तांना घडविले.

शिव-लिंगाचा आणि श्रीसाईनाथ महाराज यांचा अर्था-अर्थी काही संबंध होता का ? हाच आमच्या चर्चेचा मुख्य गाभा होता. श्रीसाईनाथ महाराजांनी मानवी देह धारण केला होता एवढेच, परंतु प्रत्यक्ष ते शंकराचे अवतार होते. श्रीशिवशंकर श्री साईनाथांच्या रुपाने या भूतलावर अवतरले होते असे म्हटल्यास

अतिशयोक्ति न व्हावी. श्रीसाईचरित्राचा डोळसपणे अभ्यास केल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, श्रीसाईनाथांचा स्वभाव, त्यांचे आचरण, त्यांच्या लीला या श्री शिव-लीलामृतात वर्णिलेल्या श्री भोलेनाथ शिव-शंकरासारख्या आहेत. श्री बाबा कधी कधी संतापत तेव्हा रूद्रावतार धारण करीत असत. अशा वेळी त्यांचे जवळ जाण्याची कुणाची हिंमत होत नसे. श्रीबाबांचा क्रोध म्हणजे डोळ्यातून जळते निखारे पडावेत असा भास होई. तात्या कोते पाटील ही एकच व्यक्ति अशी होती की, जी श्रीबाबांचा क्रोध काबूत आणी. श्रीबाबांच्या कमरेला तात्याबा घट्ट मिठी मारून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न करी. संतप्त अवस्थेत श्री साई आणि श्रीशंकर सारखेच दिसत असणार, भासत असणार.

त्या वेळचे एक थोर साईभक्त सॉलिसिटर साठे एकदा शिर्डीला आले होते. त्यांच्या बरोबर त्यांचा सेवक मेघा पण शिर्डीला आला होता. मेघाचे व्यक्तिमत्त्व जबरदस्त होते. तो एक धडधाकट तेजःपुंज ब्राह्मण होता. तो ब्रह्मचारी होता. श्रीशंकर हे त्याचे एकमेव दैवत होते. श्रीशंकराची भक्ति त्याच्या रोमा-रोमातून भिनली होती. श्री शिवशंकर हीच त्याची आस होती, त्याचा श्वास होता. आपल्या मेघाला साठेसाहेब म्हणाले— "मेघा, आज मशिदीत जाऊन श्रीबाबांची पूजा तुझ्याकडून करावी अशी इच्छा आहे."

मेघा तात्काळ गर्जून उठला— "छे, छे ! एका फकीराची पूजा ?. आणि माझ्या हातून ? कदापि शक्य नाही ! शंकराशिवाय कुठल्याहि देवाची वा मानवाची मी पुजा करीत नाही. मला आग्रह करू नका. मी नोकरी सोडीन परंतु मशिदीत येऊन तुमच्या बाबांची पूजा करणार नाही !"

"ठीक आहे." श्री. साठे म्हणाले, "माझ्या सोबत फक्त मशिदीत तर येशील ? पूजा नको करूस हवं तर"

अखेरीस मेघा मशिदीत जावयास तयार झाला परंतु एका अटीवर. पूजा तर राहोच परंतु बाबांच्याकडे बघणारसुद्धा नाही.

श्री. साठे साहेब व मेघा दोघेहि वाड्यावरून मशिदीत आले. श्री. साठे, बाबांना साष्टांग प्रणिपात करून त्यांच्या चरणाजवळ बसले. मेघा भिंतीला टेकून एका पायावर स्तब्ध उभा राहिला. पाच-दहा मिनिटांचा अवधि झाला असेल-नसेल अचानक काय घडले न कळे. मेघाने डोळे उघडले आणि डोळ्याचे पाते लवते न लवते तोच मेघा धावत श्रीबाबांच्या पुढ्यात येऊन उभा ठाकला व बाबांना म्हणाला,– "तुम्ही माझे शंकर आहात. तुमच्यात प्रत्यक्ष भगवान शंकर मला

दिसले. ती जटा, तो गळ्यातला निळा सर्प, ते कमंडलु, ते व्याघ्रासन. हो तुम्ही शंकरच आहात. मी तुमची पूजा करणार. आताच. याच क्षणी." आणि मेघा धावत जाऊन पूजेचं ताट घेऊन आला.

श्रीबाबा मेघाला म्हणाले, "अरे, मशिदीतला मी एक फकीर. माझी कसली पूजा करतोस ?" बाबांच्या बोलण्याकडे मेघाचे लक्ष होतेच कुठे. बाबांच्या कपाळावर त्याने त्रिपुंड्र ओढला. शंकराच्या कपाळावर असतो तसा. पायावर फुले-अक्षता वाहिल्या. निरांजने लावली. उदबत्ती पेटवली. आरती म्हटली. बाबांनी विरोध केला नाही. श्रीबाबांच्या कपाळावर काढलेला हा पहिला त्रिपुंड्र शिवशंकराचा साक्षात्कार घडविणारा ! शिव-स्वरूप दाखविणारा !

दगडावर आसनस्थ बसलेली श्रीबाबांची प्रतिमा सर्व परिचित आहे. बाबांची दगडी शीळेवरील ही बैठक अभ्यास करण्यासारखी आहे. श्रीबाबांचे आसन शिवलिंगासारखे आहे. कमरेच्या वरचा भाग लिंगासारखा असून उजवा आडवा पाय म्हणजे शाळूंका व डावा उभा पाय म्हणजे लिंगाचा पाया किंवा आसन होय. नीट न्याहाळून पाहिले की, श्री बाबांची ही खास बैठक किंवा आसन शिवलिंगासारखेच दिसते.

या सर्व गोष्टींचा बारकाईने अभ्यास केला की, आश्चर्य वाटत नाही की शिर्डीला समाधी मंदिरात श्रीबाबांच्या मूर्तीसमोर नंदी का बसविला आहे. शंकराच्य, देवळात शिवलिंगासमोर नंदीची प्रतिष्ठापणा केलेली असते. श्री सद्गुरू साईनाथ महाराज भगवान शंकराचे अवतार असल्यामुळे समाधी मंदिरात त्यांचे समोर नंदी बसवला आहे. हे माझे मत झाले. आता प्रश्न उद्भवतो, हा संगमरवरी नंदी केव्हा, कोणी आणि कोणत्या कारणास्तव बसविला ? जाणत्या भक्तांनी किंवा श्री क्षेत्र शिर्डी संस्थानने याबाबत स्पष्टीकरण करावे. हा प्रश्न येथेच मर्यादित नसून गुरूस्थान येथील श्री बाबांच्या फोटो समोर शिवलिंग व नंदी यांची स्थापना कशी झाली याचा खुलासा करण्यात आला तर भक्तांच्या ज्ञानात भरच पडेल हे निर्विवाद.

............

# रामसाई बोलो शामसाई बोलो

—श्री. गं. रा. भट

संदेश हौसिंग सोसायटी, सामंतवाडी,

सोनावाला रोड, गोरेगाव ( पूर्व ) मुंबई ६३

● **या** भरतभूमीत निरनिराळ्या काळी निरनिराळ्या स्थळी महान थोर ज्ञानी तपस्वी संत व साधु होऊन गेले. आपल्या महाराष्ट्रापुरता विचार केला, तर ज्ञानेश्वर एकनाथ, रामदास, तुकाराम ही नावे चटकन आठवतात. आळंदी, पैठण, सज्जनगड व देहू ही गावे या थोर संतांच्या निवासाने, चारित्र्याने व समाधिस्थाने म्हणून पवित्र क्षेत्रे झाली. ज्ञानेश्वरी, एकनाथी, भागवत, दासबोध व तुकाराम महाराजांचे अभंग हजारो लोक भक्तीभावाने वाचतात. त्यांची पारायणे करतात. भाषणात व लेखनात या संतांची वचने अवतरणे म्हणून वापरली जातात. त्यांची वाणी अमर आहे. अभंग आहे. 'जे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा. असाच या संतांच्या जीवन प्रवाहाचा ओघ होता.

शिर्डीचे श्रीसाईबाबा एक असामान्य व अलौकिक सत्पुरुष होऊन गेले. त्यांचा पण जीवनक्रम वरील संतांप्रमाणेच होता. शिक्षण म्हणावे तर निरक्षर. कोणतीही ग्रंथनिर्मिती नाही. एका दरिद्री खेड्यात एका पडक्या मशिदीत राहणारा, गावात भिक्षा मागून मिळेल त्यावर गुजराण करणारा, सुकी कांदाभाकर खाणारा एक सामान्य वेडा फकीर म्हणून समजला गेलेला, लोकांकडून अवमानिलेला, राहावयास पडकी मशीद, एक फाटकी कफनी, डोक्याला पांढरा फडका, एक सटका, एक चिलीम व एक टमरेल एवढ्या वैभवाचा धनी. पण पुढे आपल्या आचरणाने, सर्वांवर प्रेम करणारा, सर्वांना वेड लावणारा, सर्वांना चटका लावणारा, सर्वांच्या श्रद्धेचे स्थान बनला. आपल्या अलौकिक सामर्थ्याने भक्त कैवारी, संकट विमोचक व उदीरुपी प्रसादाने अमृत वाटणारा एक परमेश्वर ठरला. बाबा आपल्या मशिदीबद्दल सांगतात, ' एकदा हिचे जो अंकीं बैसला। बेडा तयाचा पार पडला। साऊलींत हिचे जो पहुडला। तो आरूढला सुखासनीं। आकंठ संकटार्णवीं बुडाला। होकामह दुःखगर्तेत गढला। जो या मशिदमाईची पायरी चढला। सुखा आरूढला तो जाणा ॥

शिर्डीला कोणतेही ऐतिहासिक महत्त्व नाही. शिर्डीला कोणत्याही शिल्पकलेचे नमुने नाहीत की कुठलेही आकर्षक सृष्टिसौंदर्य नाही की शिर्डी हे काही थंड हवेचे ठिकाण नाही. तथापि एक लहानसे खेडे असलेली ही शिर्डी श्री साईबाबांची कर्म-भूमी झाली. त्यांच्या पादस्पर्शाने वास्तव्याने पुनीत झाली. एक महान क्षेत्र झाली इतकी की तिचे महात्म्य नुसत्या भारतातच नव्हे तर परदेशात जाऊन पोहोचले आहे.

सुमारे ५८।५९ वर्षापूर्वी समाधिस्थ होऊन गेलेल्या या संताच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी शिर्डीला बारा महिने तेरा काळ लाखो लोक येतात ही काय किमया आहे ? कोणते गूढ आहे ? कोणतीही सक्ती नाही. कोणतेही निर्बंध नाहीत. कुठलाही यात्राकर नाही. प्रवेश फी नाही काही नाही. कुणी काही मागत नाही तरी पण लाखो रुपयांची दक्षिणा देणगी जमा होते. केवढा हा चमत्कार !

श्रीसाईबाबांनी कोणतीही ग्रंथनिर्मिती केली नाही हे सत्यच आहे. पण श्रीसाईबाबांच्या हयातीत व नंतर त्यांच्याविषयी इतके लिहिले गेले आहे. इतके लिहिले जात आहे व लिहिले जाईल की ते सर्व एकत्र केले तर एक महाभारत तयार होईल. कितीही लिहिले तरी ते अपूर्णच आहे. भक्तीच्या भागीरथीचा हा प्रचंड प्रवाह बाबांच्या अथांग दयासागरला जाऊन मिळतो. त्या प्रवाहात श्रीसाईबाबांचे असंख्य भक्त अवगाहन करून पावन झाले. मुक्त झाले. त्यांच्या जन्माचे सार्थक झाले. श्रीसाईबाबांना निरक्षर म्हणावे तर गीतेचा अर्थ असो की उपनिषदातील न उकललेले गूढ असो ते विशद करून सांगण्याची पात्रता होती, विद्वता होती.

अहंकार नाही. आत्मप्रौढी नाही. अवमानिल्याचे दुःख नाही. उपदेश अगदी साधा व सरळ. 'श्रद्धा ठेवा. सबुरी धरा. कुणाची निंदा करू नका. कुणाचे श्रम फुकट घेऊ नका. भुकेल्याला भाकर द्या. ऋण काढू नका. माझे स्मरण करा. माझ्यावर विश्वास ठेवा. घार आकाशात फार उंच उडते पण तिची नजर दूरवर असलेल्या आपल्या घरट्यातील पिलांकडे असते. त्याचप्रमाणे हजारो मैल दूर असलेल्या आपल्या भक्तांकडे श्रीसाईबाबांची सदैव नजर असते. भक्तांची संकटे त्यांना दिसतात. त्या संकटांचे निवारण करण्यासाठी श्रीसाईबाबांचे अदृश्य हात भक्तांच्या पाठीशी सदैव सज्ज असतात. श्रीसाईबाबा सर्वज्ञ आहेत. सर्वसाक्षी आहेत. जसा विश्वास—जशी भक्ती तसा अनुभव. कासवीच्या पिलांना दूध किंवा चारा दाणा लागत नाही. ती केवळ आपल्या आईच्या दृष्टीच्या ऊबेने पोसली जातात. त्याचप्रमाणे श्रीसाईबाबांना पण भक्तीची ऊब जाणवते, समजते व आवडते. ही भक्तीची ऊब

जिथे जिथे सापडते तिथे तिथे ते न बोलावता धावून जातात. भक्तीच्या ऊबेसाठी ते सदैव भुकेले आहेत. ' त्रिविध तापें तापलेला। वरी साईच्या दर्शना गेला। ऐसा कोण विन्मुख गेला। जो न निवाला अंतरीं ॥ जया न कोणी मालक वाली। तया सांभाळी साई माउली। सडलीं पडलीं आणि कावलीं। तीं विसावलीं मशिदीत ॥

सुरवातीला हकीम म्हणून गाजले. उपचारांची तऱ्हा तर अशी विचित्र की हसावे की रडावे हेच समजत नाही. कुणाचे डोळे सुजले. बाबांनी त्याच्या डोळ्यात बिब्बे ठेचून भरले. डोळे साफ बरे. कुणाला मोडशी झाली. त्याला भाजलेले भुईमुगाचे दाणे खावयास देऊन वर पाणी प्यावयास दिले. मोडशी बंद. कुणाला पटकी झाली. तर औषध काय ? ' बदाम, पिस्ते व अक्रोड खा ' असे सांगितले. पटकी साफ बरी. कुणाचा हिवताप हटेना. मग उपचार काय ? त्याला सांगितले, ' काळ्या कुत्र्याला दहीभात खाऊ घाल. ' बस. हिवताप कायमचा बंद. कुणाला चिलीम ओढावयास दिली. त्याचा दमा कायमचा बंद–नुसत्या ऊदीने कितीजणाना बरे केले त्याची तर गणतीच नाही. एक का दोन. असंख्य गोष्टी घडल्या. पीडीतांची आणि दुःखितांची शिर्डीला रीघ लागली.

श्रीसाईबाबांच्या बाबतीत एकात्मतेचा इतका विस्तार झाला होता की दर्शनाला आलेल्या माणसाचे मनोगत त्यांना न सांगताच समजत असत. मनुष्य भक्तीभावाने दर्शनास येवो किंवा कुत्सित भावाने. दोघेही बाबांचे अंकित होऊन परत जात.

कुणावर रागावत. कुणाला शिव्या देत. कुणाला मारायला धावत. कुणावर विटेचे तुकडे फेकून मारीत. कुणाला धारेवर धरीत. कार्यकारणभाव कुणालाही समजत नसे. पण शेवटी कारुण्याचा झरा वाहू लागे व सर्व काही मंगल होई. ' संत आरंभी उग्र भासती। तरी त्या पोटीं लागेवीण प्रीति। अल्पधीर पाहिजे चित्तीं। करतिल अंतीं कल्याण ॥ मशिदीत सदैव वास्तव्य असूनसुद्धा आपल्या भक्तांना कुठेही, केव्हाही कोणत्याही रूपाने दर्शन देत. केव्हा केव्हा त्या भक्ताला कल्पना पण नसे की बाबा आपल्याला भेटून गेले याची. कुणाला रामरूपाने, कुणाला रामदासांच्या रूपाने, कुणाला संन्याशाच्या रूपाने कुणाला त्याच्या समाधिस्थ गुरुच्या रूपाने तर कुणाला छबीच्या रूपाने, तर बाळाराम मानकराना मच्छिंदर गडावर प्रत्यक्ष दर्शन दिले. कुणासाठी टांगेवाला झाले, कुणाला दादरचे तिकीट देण्यासाठी कुणबी झाले, कुणासाठी पाटीत पेरू घेऊन धावले. तर कुणासाठी वाल पापडीच्या शेंगा घेऊन धावले. भक्तांचे संकट टाळण्यासाठी ते कोणत्या रूपाने उभे राहतील कुठून कशी

कळ दाबतील त्यांचा काही नेम नाही. त्यांच्या लीला अगाध आहेत. विश्वासाने जो जो त्यांच्या पायाशी गेला तो तो चित्त प्रसन्न होऊन परतला. दुःखमुक्त झाला.

श्रीसाईबाबांनी कुणाला कसली दीक्षा दिली नाही की कुणाला मंत्रोपदेश केला नाही. त्यांनी आपल्या सर्व भक्ताना एकच गोष्ट सांगितली, ' अरे या मशिदीत बसून मी असत्य भाषण करणार नाही. मी मेलो तरी माझी तुर्बत ( कबर ) तुमच्याबरोबर बोलत राहील, डोलत राहील. तुम्हाला दुःखमुक्त करील. माझे सतत स्मरण करा. मला विसरू नका. ' बाबांचे हे आश्वासन, बाबाची ही जागती समाधी आजही पुरे करीत आहे आणि, हे शिर्डीच्या यात्रेचे इंगित आहे. ' जया मनीं जैसा भाव तया तैसा अनुभव ' याचा प्रत्यय श्रीसाईबाबांचे लाखो भक्त आजही घेत आहेत. ' प्रेम नुपजे भावावीण । भाव तेथें देव जाण । भावापोटीं प्रेमपूर्ण । भावचि कारण भवतरणा ।। '

कल्पना करा. सत्तर वर्षापूर्वीचा काळ. नाही प्रवासाची सोय. नाही वाहनांची सोय. शिर्डीसारखा एक खेडे गाव. कसल्या सोई नाहीत. हिंदु समाजात कर्मठपणाचा अतिरेक होता. अशा काळात मोठेमोठे विद्वान, पदवीधर, मोठेमोठे अधिकारी, कर्मठ ब्राह्मण, धनिक, रावरंक त्यांच्या भजनी लागले ते काय अंधश्रद्धा म्हणून ? या सत्पुरुषाची केवढी योग्यता होती ! केवढे सामर्थ्य होते ! की त्यांच्या पुढे सर्व प्रकारचे लोक नतमस्तक होत. पण इतके असूनसुद्धा शिर्डीला वाटेल तेव्हा जाता येत नसे–येत नाही किंवा तिथे वाटेल तितके दिवस राहातापण येत नाही. श्रीसाईबाबा म्हणतात, ' माझी इच्छा झालियावीण । दारुंठा त्यागील कवण । कोणा स्वेच्छे होईल दर्शन । घडेल आगमन शिर्डीचे ।। त्याचप्रमाणे ते हे पण सांगतात, ' माझा माणूस देशावर । असे का हजारो कोस दूर । आणीन जैसे चिडीचे पोर । बांधून दोर पायास ।। म्हणजे शेवटी असेच म्हणणे भाग आहे की, 'जेव्हां बहुजन्म संपादित । प्राक्तन कर्म उदया येत । तेव्हाच संत समागम लाभत । मोहजनित तम नाशे ।

खरोखर धन्य आहे ती शिर्डी आणि धन्य आहेत ते सर्व 'जयासंगे साई खेळले । हंसले, बसले, बोलले चालले । जेवले पहुडले रागेजले । भाग्यागळे ते सर्व ।। श्रीसाईबाबा आपल्या भक्ताना एक साधी उपासना सांगतात. 'वरी ऐक सांगतो शामा । प्रेमें घेईल जो मन्नामा । तयाच्या मी सकल कामा । पुरवीं प्रेमा वाढवी ।। जो मन लागी अनन्य शरण । विश्वासयुक्त करी मद्भजन । माझे चिंतन माझें स्मरण । तयाचें उद्धरण ब्रीद माझे ।। कृतांताच्या दाढेतून । काढीन मी निजभक्ता ओढून । केवळ करितां मत्कथाश्रवण । रोग निरसन होईल ।। दुर्दैव असे की एवढी साधी उपासना-

सुद्धा श्रीसाईबाबांच्या अपेक्षेप्रमाणे माझ्या हातून होत नाही. एखादे संकट गळ्याशी आल्यावर जीव कासावीस होऊन मी श्रीसाईबाबांचा जो धावा करतो, त्यांची करूणा भाकतो त्यात जो जिव्हाळा असतो, आंतरिक तळमळ असते त्या प्रकारचा जिव्हाळा किंवा आंतरिक तळमळ मी श्रीसाईबाबांची जी रोज पूजा आरती करतो किंवा पोथी वाचतो त्यावेळी असते का? मुळीच नसते. हे मी माझ्यापुरते उत्तर देत आहे. हा फरक श्रीसाईबाबा जाणतात. त्याना तो समजतो. याचे एक उत्तम उदाहरण आहे ते असेः—एक मद्रासी गृहस्थ आपली पत्नी, बहीण व मुलगी बरोबर घेऊन यात्रेला निघाला. वाटेत त्याला शिर्डी गाव लागला. तिथे त्याला समजले की श्रीसाईबाबा गोरगरिबाना रोज पैसे वाटतात. खूप पैसे मिळतील या आशेवर दोन महिने शिर्डीस राहिला. मशिदीत तो रोज भजन पूजन करीत असे. एक दिवस त्याला स्वप्न पडले. ( स्वप्नाचे सूत्रधार श्रीसाईबाबाच ) स्वप्नात एक पोलिस शिपाई रक्तबंबाळ होऊन पडलेला आहे. बाजूला हा मद्रासी गृहस्थ उभा आहे आणि तिथे श्रीसाईबाबापण आहेत. तेव्हा श्रीसाईबाबा त्याला म्हणाले, 'अरे लबाडा, थांब तुला आता पकडतील. तूच या शिपायाला मारलेस.' त्यावर तो मद्रासी गृहस्थ फार घाबरला व बाबांचे पाय धरून म्हणाला, 'श्रीसाईबाबा, काहीही करा पण मला वाचवा. माझे रक्षण करा मी तुमच्या पाया पडतो.' मग श्रीसाईबाबा त्याला हसून म्हणाले, 'ऊठ बेटा, आता मला असे सांग की आता तू मला जो नमस्कार केलास त्यात आणि मशिदीत तू मला जे रोज नमस्कार करतोस त्यात काही फरक आहे का?' तो मद्रासी गृहस्थ सद्गतीत अंतःकरणाने म्हणाला, 'श्रीसाईबाबा मला क्षमा करा. मशिदीत मी जे नमस्कार केले ते स्वार्थापोटी. त्यात जिव्हाळा नव्हता, विश्वास नव्हता, सद्भाव नव्हता की प्रेम नव्हते. ती फक्त एक कोरडी कवाईत होती. पण आताचा नमस्कार परमेश्वरभावाने करीत आहे.' जरी हे सर्व स्वप्न असले तरी किती बोलके उदाहरण आहे. त्यावर निराळे भाष्य करण्याची जरूर नाही.

'दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा। पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा
माय कैकयी ना दोषी नव्हे दोषी तात। राज्यत्याग कानन यात्रा सर्व कर्मजात

खेळ चालला हे माझ्या पूर्व संचिताचा। पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा (गीतरामायण ग. दि. माडगुळकर) प्रत्यक्ष प्रभू श्रीरामचंद्राचे हे उद्गार आहेत. तिथे माझ्यासारख्या पामराची काय कथा? आयुष्यात जे जे काही चांगले घडले किंवा घडेल ते सर्व श्रीसाईबाबांच्या कृपेचे फळ होय व जे काही अप्रिय घडेल किंवा घडले ते माझ्या पूर्व संचिताचे फळ होय. माझ्या कुकर्माचे फळ होय अशी माझी धारणा आहे. म्हणून मी बाबांना कदापि विसरणार नाही. मी त्यांचा सर्वस्वी ऋणी आहे.

कृतज्ञ आहे. जे आहे ते सर्व त्यांचे आहे. माझे काहीही नाही. माझे आहेत ते एक फक्त श्रीसाईबाबा.

मोरोपंत म्हणतात त्याप्रमाणे 'सदैव अपराध हे रचितसे असे कोटिगा। स्वयें हि कथितों नसे तिळहि लाज मी कोटिगा ॥ (केकावली). श्रीसाईबाबांचा दयासागर इतका अथांग आहे की त्यात भक्तांच्या अपराधांचे कितीही डोंगर आणून टाकले तरी तो दयासागर कधी आटणार नाही. कमी होणार नाही. आणि म्हणूनच की काय माझ्या सारखा कोटिगा (निर्लज्ज) पदोपदी चुका करीत असतो.

श्रीसाईसच्चरित्र वाचणारे वाचक सहाजिकच प्रश्न करतील, 'अहो, एवढी लेखणी झिजवून तुम्ही नवीन काय सांगितलेत?' खरे आहे. क्षमा करा. मी काहीच नवीन सांगू शकलो नाही. 'वेडावाकुडा गाईन परितूझा म्हणवीन' एवढेच साधले. मन स्वच्छ झाले. निर्मळ झाले. मनाला समाधान झाले. माझी खरी असमर्थता हीच आहे की जेव्हा जेव्हा श्रीसाईबाबांबद्दल नवीन काही शोधण्याचा प्रयत्न करतो तेव्हा तेव्हा 'नेति' 'नेति' हेच फल माझ्या पदरी पडते. मति कुंठित होते. श्रीसाईबाबा एक थोर सद्‌गुरू होते. 'गुरुःसाक्षात् परब्रम्ह तस्मै श्रीगुरवेनमः' म्हणजे साक्षात् जे परब्रम्ह आहे त्याचे जर आकलन झाले, ज्ञान झाले तर मग आणखी काय पाहिजे? माझा तो अधिकार नाही. माझी ती पात्रता नाही.

श्रीसद्‌गुरू साईबाबा,'त्वां आम्हा धरितां पोटाशीं। मावळेल अज्ञानतम निशि। सुखे नांदू तुझिया प्रकाशीं। उणें आम्हासी कायसें ॥ कलत्रपुत्र मित्र पंक्ती। कोणी कामा येती न अंती। तूंचि एक अखेरचा साथी। सुख निर्मुक्तिदायक तूं ॥

श्रीसाईबाबा, तूंच आमचा रक्षणकर्ता आहेस. त्राता आहेस. उद्धारकर्ता आहेस. विघ्नहर्ता आहेस. तूच आमचा चिंतामणी आहेस. आजपर्यंत तुझ्या हाताचा आधार घेऊनच वावरलो. आता मृत्यूचा उंबरठा ओलांडताना तुझा दयाळू हात असाच माझ्या पाठीवर राहू दे. एवढीच कळवळून प्रार्थना आहे. आता कसली इच्छा नाही. वासना नाही. कामना नाही. आशा नाही. आकांक्षा नाही. आणखी काय सांगू? व आणखी काय मागू? तरी पण एक मागणे मागतोच. ते असेः– 'प्राणिमात्र राहो सुखी। नसो कोणी रोगी दुःखी। मरण येवो सुखा सुखी। घेता मुखी तुझे नाम ॥'

लेख फार लांबला. पण काय करू? श्रीसाईबाबांचे गुणगान करताना लेखणी इतक्या वेगाने धावू लागते की त्या लेखणीला मग जाणीवच राहात नाही. की आजपर्यंत जे कित्येकानी आधीच लिहिले आहे तेच पुन्हा पुन्हा लिहिले जात

आहे. असे दुसऱ्याचे उष्टे कुणाला आवडणार ? कुणाला आवडो वा न आवडो पण ज्या श्रीसाईबाबानी भक्ताने पाठविलेला उष्टा पेढा मोठ्या आवडीने खाल्ला ते माझे हे उष्टे लेखन गोड मानून घेतील असा भरवसा वाटतो.

ही शब्दमाला नचदे सुगंध
जाणीतसे मी मतिमूढ मंद
तुला अर्पिताना मनि ना विषाद
वंदुनि साई, तवपुण्यपाद

*

..............

# बाबांनी लग्न जुळविले

–श्री. अनिल केशवराव रसाळ,
बिल्डींग नं. २१, खो. नं. ३८२, बी. पी. टी. स्टाफ क्वॉर्टर्स,
रेनॉल्डस रोड, वडाळा ( पूर्व ) मुंबई—४०००३७

● १९७४ साली लग्नाच्या प्रयत्नात होतो. वयाची ३३ वर्षे झाली. लग्न जमवण्यास अडचणी येऊ लागल्या. कारण मुलाला आईवडील नसणे, स्वतःची खोली नसणे, त्याच्या बहिणीने आंतरजातीय विवाह करणे या सर्व उण्या बाजू. नातेवाईकांची मदत याबाबत नाही. अशावेळी अनाथांचा नाथ श्रीसाईनाथ यांच्या शिवाय मदत कोण करणार ? सर्वच बाजूने निराशा होती. अशा परिस्थितीत घरची लहान बहीण ती अवलंबून. तिची काळजी घेणारे कोणीतरी हवे. म्हणजे थोडसं स्थिर होता येईल.

म्हटलं हरकत नाही. आपण स्वतः जिथे काम करू तिथे प्रयत्न करू. त्यात सपशेल निराशा झाली. मनाच्या अतिशय बिकट अशा परिस्थितीत एके दिवशी श्रीसाईबाबांचा जप सतत ८ तास करून झोपलो. झोपण्यापूर्वी देवाला सांगितले की, 'तू जर असशील तर दृष्टांत दे.'

रात्री १२–३० नंतर झोपेत असताना तळपायातून डोक्यापर्यंत एक विजेची लकेर फिरत असल्याचे वाटले. डोळे उघडण्याचा प्रयत्न केला परंतु ते उघडेनात. तसाच निपचीत पडून राहिलो. तोच आवाज आला. "मी तुझे लग्न जुळवतोय. तू जिच्याशी लग्न करशील त्या मुलीला मैत्रिणीसारखं वागव." नंतर आवाज थांबला आणि मगच डोळे उघडले गेले. देवघराजवळ गेलो. दिवा व अगरबत्ती लावली. हात जोडले. स्वतःच्या खाजगी डायरीत नोंद केली.

त्यानंतर सुमारे १५ दिवसांनी लहान सफेद कफनी व बाबांसारखे मुंडासे लावलेला तेजःपुंज १६ वर्षांचा मुलगा ऑफिसला जायच्या वेळेला आला. उंबरठ्याच्या बाहेरूनच मला सांगितले तुझ्या घरी चहा घ्यायचा आहे. त्यावेळी मी पूजा करत होतो. त्यांना सांगितले, पूजा झाल्याशिवाय मी बोलणार नाही. 'तुम्हाला चहा बहीण करून देईल.' बसण्यासाठी खुर्ची दिली. ती नाकारून 'मी पोत्यावर बसतो. मला पोतं दे.' म्हटलें पोत नाही चटई चालेल ? त्यांनी हो म्हटल्यावर मी चटई दिली. बहिणीने चहा दिला. मी पूजा करू लागलो. पूजा संपली व चटईच्याकडे गेलो. तेव्हा त्यांनी जे प्रश्न विचारले त्याला खालील उत्तरे दिली.

माझा हात हातात घेऊन पहिला प्रश्न विचारला,

"हे काय आहे ?"

"हात."—मी

"कापून घेऊ का ?"

"घ्या"—मी.

"वाईट नाही वाटत ?"

"नाही"—मी

"का ?"

"देवाने दिला. त्याने घेतला"– मी.

"अजिबात देहाभिमान नाही" असं पुटपुटत त्यांनी हात सोडला. मग म्हणाले, "नाशिकला जायचय पैसे पाहिजेत ?"

"किती ?"–मी

"१५ रुपये."

"देतो" असं म्हणत पाकिटातून २० रुपये काढले. दहाच्या दोन नोटा होत्या. सुटे नव्हते म्हणून दोन्ही नोटा दिल्या.

"वाईट नाही वाटत ?"

"नाही"–मी.

" का ?"

" देवाने दिले. त्याने घेतले. " मी.

" मला धनगराच्या पोरासाठी जोडे हवेत. उन्हात हिंडतोय तो. देतोस का ?"

" हे घ्या "–मी.

" जीवाला वाईट नाही लागत ?"

" नाही "—मी.

" मग माझा हात हातात घेऊन झोळीतून १० पैशाचे १ नाणे काढले. व मला म्हणाले, ह्याची पूजा कर. " १५ दिवसात लग्न करीन " असं म्हणत निघून गेले. जाताना उदी दिली.

१५ दिवसानंतर गुरुवारी त्याची पूजा करताना एक वृद्ध गृहस्थ आले. त्यांनी आणलेले स्थळ सर्व दृष्टीने सुयोग्य होते. ते स्विकारले, व आता लग्न होऊन सुखी आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे सासरेबुवा व मुलगी दोन्ही साईभक्त आहेत व लग्नाच्या आधी ऑफिसचे क्वॉर्टर्ससुद्धा मिळाले.

*

.............

# ध्यानी मनी बाबा, बाबा

—**श्रीराम सातर्डेकर**, परळ.

● दि. १५ फेब्रुवारी ७७ रोजी परमपूज्य श्रीसाईबाबांच्या पादुकांचे संत मोहिते बाबांच्या साईमंदिरात वरळी येथे आगमन होणार होते. गुरुवार दि. १७ रोजी माझा भक्तिगीतांच्या सेवेचा कार्यक्रमही आयोजित केला होता. परंतु माझ्या धाकट्या बंधूंचे अकस्मात् अपघाती निधन झाल्यामुळे मला या सोहाळयास हजर राहणे शक्य झाले नाही. बुधवारी मी नाशिकला होतो. परंतु सर्व लक्ष इकडच्या कार्यक्रमांकडे होते. गुरुवारी तर जास्तच आठवण येवू लागली. (आज मी बाबांची सेवा करणार होतो.) रात्री १० वाजता बाबांच्या आरतीचे स्वर ऐकू येवू लागले. सकाळी उपाध्यांना विचारले त्यांनी सांगितले की, जवळच्या चौकात प्रत्येक गुरुवारी दत्ताची व बाबांची आरती होते. शुक्रवारी बंधूचे सर्व क्रियाकर्म विधि

आटोपून मुंबईस यावयास निघालो. शुक्रवार ते रविवार मुंबईस साई निकेतनमध्ये पादुका ठेवण्यात येणार आहेत असे ऐकण्यात आले होते. त्यानुसार नाशिकला ४ वाजता मुंबईस येणाऱ्या बसमध्ये बसलो. पुन्हा विचारचक्र सुरू झाले.

रात्री आपण ८॥ ते ९ पर्यंत दादरला जाऊ. लगेच साई निकेतनमध्ये जाऊन दर्शन घेवू व बाबांची सेवा करू! या विचारात असतानाच घोटीच्या अलिकडे पहिले रेल्वे फाटक लागते. त्या ठिकाणी अकस्मात निळा टेम्पो तिच्यावर भगवा ध्वज व श्रीसाईबाबांची आशिर्वादाची प्रतिमा दिसली. एकच क्षण! आणि त्या क्षणीच गुरुवारी शिर्डीस ९। वाजता पालखीत ठेवण्यासाठी द्वारकामाईत मंदिरातून नेण्यात येणाऱ्या पादुका त्यांच्या शेजारीच बाबांच्या हातातील सोटा हे दृष्य नजरेसमोरून झटकन सरकून गेले. माझे हात जोडले गेले. माझ्या शेजारी बसलेले माझे भाचे विचारतात, दादा! तुम्ही अकस्मात कुणाला नमस्कार केलात! देऊळ वगैरे तर काही दिसले नाही! काय सांगणार! हृदयातील तळमळ मलाच जाणवली. श्रीबाबांनी अशा प्रकारे मला दर्शन देवून सांगितले, तुझी सेवा माझ्याकडे रुजू आहे! नाराज होऊ नकोस! त्यांच्या आशिर्वादाचा उंच हात नजरेला अजूनही दिसत आहे!

..............


## —श्रीसाईलीला—

जगातील सर्वात स्वस्त सचित्र मासिक

वर्षभर श्रीसाई साहित्याचा आपल्या घरात सुगंध पसरवा

वर्षातून पाच खास अंक

वा. वर्गणी ६ रु. [ट. हं. सह] कि. ६० पैसे

# वाऱ्यावरचे विचार

–श्री. द. शं. टिपणीस,
वजिफदार लॉज, ठाणे

## २९ सावली

एक लहान मुलगा होता. एकदा खेळता खेळता त्याचे लक्ष आपल्या सावली कडे गेले. त्याला गंमत वाटली; तो नाचू लागला. सावली नाचू लागली. त्याने हात वर केला. तिने तसेच केले. धावला सावली धावली. कधी मागे, कधी पुढे तर कधी बाजूला, मग त्याच्या लक्षात आलं की सावली कधी ठेंगू होते तर कधी त्याच्या पेक्षाही उंच होते. सावली त्याची खेळगडी बनली. रोज तो नाचे बागडे व सावलीच्या गमतीत रंगून जाई, सावली ही प्रत्येकाला असते. जगात सूर्य आहे तोपर्यंत सावली ही आहेच- फक्त देवाला सावली नसते असं नलदमयंती आख्यान सांगतं. सोडू म्हटल्यानं सुटायची नाही. धरू म्हटल्यानं धरवणार नाही. माकडाला शेपूट असतं पण त्याचा वंशज जो मानव त्याला मात्र शेपूट नाही हे पाहून देवाला वाईट वाटले व त्यानं माणसाच्या मागे कर्तव्याच्या सावलीचे शेपूट लावले. म्हणून कर्तव्य सोडता येत नाही की ते आपल्याला सोडीत नाही. त्याच्यापासून दूर पळता येत नाही. माणूस व सावली यांची फारकत होऊ शकत नाही. सावलीचा आकार परिस्थिती-प्रमाणे बदलतो. वाटोळ्यावर वर्तुळाकार व सपाटावर सपाट. कर्तव्याची सावली परि-स्थितीच्या उन्हाप्रमाणे ठेंगू वा ताडमाड उंच होत असते. ती व्यक्ति व्यक्तीच्या प्रमाणे आकार धारण करते. ही सावली त्या सावलीप्रमाणे वागत नाही तर हिच्या प्रमाणे माणसाला वागावे नाचावे लागते. परिस्थिती बदलते, कर्तव्य बदलते तसं माणसाला बदलले पाहिजे. ऑफिसमध्ये ऑफिसरचे कर्तव्य, घरी आल्यावर कुटुंब प्रमुखाचे कर्तव्य. ज्या स्थानावर असेल त्या स्थानाचे कर्तव्य करणे प्राप्त आहे, असं न केलं तर अध्यात्मिक तशीच राष्ट्रीय हानी होईल, यात तडजोड नाही. अकाली अदलाबदल नाही. याची सावली त्याला असं कधी झालं आहे का? सावली कशी परिस्थिती-प्रमाणे माणसाप्रमाणे बदलते. कधी तक्रार आहे का आपली तिच्याबद्दल? तसंच कर्तव्य, त्याबद्दल तक्रार नको की विरोध नको. नैसर्गिक, वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय वगैरे नाना कर्तव्ये माणसाने पार पाडली पाहिजेत. इलाज नाही. माणूस आहोना? कर्तव्य माणसाला असतं, पशूंना नव्हे हे ओळखले पाहिजे. लहान मुलं कशी सावलीत रंगून जातात तसं आपण कर्तव्यात रंगून गेले पाहिजे.

## ३० पाच बोटे

भाजी घेतली. एक भेंडा जून होता. म्हटलं, 'हा जून आहे. दुसरा बदलून दे.' तर म्हणतो कसा, 'साहेब, एकादा असायचाच. हाताची पाची बोटं सारखी नसतात.

तो भेंडा माझ्या पिशवीत ढकलताच पैसे दिले त्याला. त्यात एक गुळगुळीत होता. तसा म्हणतो. साहेब एक गुळगुळीत आहे. बदलून द्या,-म्हटलं, 'काय करणार, असायचाच. हाताची पाची बोटे सारखी नसतात.' चालू लागलो. दुकानदार आपला असा तसाच होता. म्हणून निभावले. भेंड्यांची भाजी केली खाल्ली व गेली. पण पाची बोटे सारखी नसतात हे वाक्य मनातून जाईना. विचारांची भिंगरी भिरभिरू लागली पटलं—

हाताला पाच बोटे असतात पण ती सर्व सारखी नसतात. सर्वात ठेंगू अंगठा. ठेंगू मूर्ती पण थोर कीर्ति असा. राहिलेल्या चौघांची धाकटी बहीण करंगळी. राहिलेल्या तिघातला मधला सर्वात लांब आंगठा हा सर्वांचा दादा. त्याच्याखेरीज पान हलायचं नाही. एकाद्या कार्यात तो नसला तर बाकींच्याकडून धड कार्येही व्हायचं नाही. लहान मोठा असा भेद त्यांच्यात आहे. कर्तृत्वाने कोणी श्रेष्ठ तर कोणी कनिष्ठ आहेत. पण भेदाची भावना त्यांच्यात नाही. ते कधी वादावादी करीत नाही की भांडत नाही. जो तो आपलं कर्तव्य ओळखून ते तत्परतेने व चोख करतो. कोणी कोणाला खाली ओढण्याचा प्रयत्न करीत नाही. असं झालेलं कधीं कोणी ऐकलं आहे काय ? आंगठा रुसला तर कित्येक काम करणं अशक्य होईल. द्रोणानं एकलव्याचा अंगठा काढून घेतला, काय झालं. एकलव्याची सर्व धनुर्विद्या फुकट गेली की. चौघे संपावर गेले तर अंगठा घरी बसून राहील. श्रेष्ठ असला तरी एकटा काय करणार ? पाचांनी आपापसात एकीने सहकार्य करून हात लावला तर ते कार्य यशस्वीपणे पार पडू शकेल. शक्ति प्रत्येकात असली तरी तिला यश येण्यास एकजूट पाहिजे. संघ शक्ति ही वैयक्तिक शक्तिपेक्षा अधिक सामर्थ्यशाली असते. बोटांची एकमेका साहाय्य करू ही संघशक्ति पाहवयाची असेल तर एक बोट मिटा. लगेच एक दोघं त्याच्या साहाय्यासाठी धावतील. चार बोटं मिटलीत तर कशी खांद्याला खांदा लावून एकाच सरळ रेषेत उभी रहातात व अंगठा त्यांच्या बाजूला कसा कमांडरसारखा शोभतो ते पहा. नुसत्या बोटांचेही सामर्थ्य कमी लेखू नका. गमतीदार उदाहरण पहा ना. एकाद्या पुण्य कार्यात पत्नीनं पतीच्या हाताला नुसती बोटे लावली तर ती तिला पुण्याचा अर्धा वाटा मिळवून देतात. संयुक्त राष्ट्र (Union) असेल तर अंगठा हा केंद्र आहे व बाकीची बोटं ही घटक राज्ये आहेत. पाच बोटात कमी जास्तपणा असेल पण कार्य करताना एक श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ असा भेद ते करीत नाही. जो तो आपल्या कर्तव्यापुरता श्रेष्ठच आहे. सर्वांच्या सहकार्यामुळे प्रचंड राष्ट्रशक्ति निर्माण होऊन ती मेरु पर्वतही उचलू शकेल. पाच पांडवांची एकी शंभर कौरवांना भारी गेली. कारण त्यांच्या एकीत 'एक' आपोआप आलाच. तो 'एक' पाठीशी असल्यावर यशाबद्दल संशय कशाला ?

# बाबा आपल्या भक्तांना सांभाळतात

--श्री. अनिल पंडित, इंदूर

● बाबांची भक्तीभावाने सेवा करून जवळ जवळ आज १७-१८:वर्षाचा काळ लोटला आहे. ह्या काळात बऱ्याच छोट्या मोठ्या घटना घडल्या. बरीच संकटे आली पण सर्व संकटातून बाबांनी माझी व्यवस्थित सुटका केली. ही बाबांची माझ्यावर फारच मोठी कृपा आहे.

सुरवातीला बाबांवर विश्वास बसण्याकरिता बाबा स्वतः स्वप्नात येत व गोष्टी करीत. बाबांवर माझा विश्वास वाढतच गेला, प्रचितीवर प्रचिती येत गेल्या, आता मात्र बाबा प्रत्यक्ष स्वप्नात न येता फोटो किंवा मूर्तीरूपाने दिसतात.

बाबांच्याच कृपेने माझी प्रगती झाली आहे यात मुळीच शंका नाही. माझ्या आर्थिक परिस्थितीत बदल घडून येण्याकरिता दोन कारणे मूळात आहेत. एकतर बाबांवर विश्वास व दुसरे कारण आयुष्यात चांगले दिवस येण्याकरिता धीर.

मला १९७५ साली बाबांबद्दल एक मजेदार अनुभव आला. त्या घटनेची आठवण झाल्यावर बाबांबद्दल माझा विश्वास द्विगुणित होतो, तसेच बाबांच्या लीलेचे कौतुक केल्यावाचून राहवत नाही.

घटना अशी की, मला त्यावेळी फिरतीची नोकरी होती. गावोगावी दौऱ्यावर सारखे जावे लागत होते. तिन्ही ऋतूमधे त्रास. कारण नोकरीच तशी होती.

सप्टेंबर १९७५ ची गोष्ट ती. आदल्या रात्री पाऊस मी म्हणत होता. पावसाळ्याचे दिवसच ते. त्या दिवशी मला इन्दूरहून १०० किलोमिटरवर खोतगाव नावाच्या गावी जावयाचे होते. त्या दिवशी सकाळी पाऊस थोडा थांबला होता. म्हणून मी सकाळी इन्दूरहून निघण्याचे ठरविले. बायकोला सांगितले की, नेहमीप्रमाणे परत येण्यास रात्र होईल. आकाशात ढग भरले होते. बायकोने दौऱ्यावर जाण्यास मनाई केली, पण नोकरी असल्याने तिच्या बोलण्याकडे फारसे लक्ष दिले नाही. बाबांचे नाव घेऊन त्या गावी जाण्याच्या बसमधे बसलो.

ज्या गावी मला जावयाचे होते त्या गावी आणि इंदूरच्या वाटेमधे छोट्या मोठ्या चारपाच नद्या व काही छोटे नाले आड येतात. मी बऱ्याच वेळा त्या गावी गेलो होतो, पण पावसाळ्यात जाण्याचा हा पहिलाच प्रसंग. वाटेत थोड्या अंतरावर पाऊस सुरू झालाच. आमची बस कसेतरी करून, नदी व नाले पार करून त्या

गावापासून १किलो मिटरवर येऊन थांबली कारण गावालाच लागून एक मोठी नदी होती. त्या नदीवर फारच पाणी चढले होते. ड्रायव्हर व कंडक्टरचे म्हणणे पडले की, आम्ही आता हीच बस परत इंदूरला नेतो. मी पण लगेच त्याच बसने परतण्याचा निश्चय केला. मनात अतिशय निराशा झाली की, इतके तास प्रवास करून शेवटी काम झाले ते नाहीच व परत परतावे लागले.

रात्र बरीच झाली होती. बसमधे आम्ही दहाबारा पॅसेंजरच होतो. काही अंतरावर गेल्यावर आम्हाला गाडीतच झोपावे लागले कारण वाटेत नद्यांना फार पूर होता. ड्रायव्हरला गाडी चालविणे कठीण झाले. ती रात्र फारच भयाण वाटली कारण बाहेर अंधार, जोराचा पाऊस व विजा चमकत होत्या. रात्रीचे बारा वाजून गेले होते. गुरुवारचा दिवस तो. मी बाबांची मनात आरती केली व प्रार्थना केली की बाबा हे काय नवीन संकट उभे केले. दुसऱ्या दिवशी घरी महालक्ष्मीचे जेवण होते. बाबांना म्हटले की, बाबा कसेही करून मला दीड दोनच्या सुमारास जेवण्याच्या वेळेपर्यंत घरी पोहचवून द्या.

ज्या गावात आमची बस थांबली होती त्या गावाच्या लोकानी आम्हाला आणखी घाबरून सोडले की, हा पाऊस दोन तीन दिवस तरी थांबण्याची शक्यता नाही व नद्यांचे पाणी जर उतरले नाही तर एक आठवडा पण थांबावे लागेल.

इंदूरला त्याच रात्री परत येण्याचे असल्याने बरोबर खाण्याचे व काही कपडे पण नव्हते. मी फारच घाबरून गेलो. सारखा बाबांचा धावा चालू होता. बाबांच्या नावाचा जप सुरू होता व घराकडे लक्ष लागले होते. मनात सारखा एकच विचार येत होता की कुणीकडून येथे येण्याची बुद्धि झाली. घरी होतो तोच बरा होतो. घरच्यांचे जर ऐकले असते तर ही वेळच नसती आली, पण बाबांनी मनापासून केलेली माझी प्रार्थना ऐकली. ज्या पावसाच्या थांबण्याची शक्यता काही दिवस नव्हती तो पाऊस शुक्रवारी सकाळी म्हणजे दुसऱ्याच दिवशी सकाळी थांबला, काही तासातच नद्यांचे पूर ओसरले. बाबांनी मला एक दिडच्या सुमारास इन्दूरला पोहचविले.

आजपण त्या प्रसंगाची जेव्हा आठवण होते तेव्हा बाबांच्या प्रतिमेवर अश्रुंचा वर्षाव होतो, व बाबा आपल्या भक्तांना कसे सांभाळतात ह्याचे कौतुक वाटते.

.............

# धार्मिक संगमाचे महान प्रतिक श्रीसाईबाबा....

-श्री. रमेश दामोदर उदवंत,
उपासनी गल्ली, संगमनेर

● दासगणू महाराजांनी श्रीसाईनाथ स्तवन मंजरीमध्ये संतरूपी गोदावरीचा उल्लेख केलेला आहे आणि १९ व्या शतकात या संतरूपी गोदावरीस श्री साईबाबा हे संतरूपाने आलेला पूर आहे, असे वर्णन केले आहे. किती यथार्थ ओळी आहेत या...

भारतीयांच्या मनात अनेक थोर संत आपल्या तेजस्वी आध्यात्मिक विचारसरणीने जिवंत आहेत. या भारत देशात अनादिकालापासून ही संतरूपी गोदावरी वाहात आहे, वाहणार आहे. पावसाळे येतात, जातात... नदीला पूर येतात, येतील पण एका आगळ्या, वेगळ्या स्वतःचे असे वैशिष्टय असलेला पूर या संतांच्या श्रीसाईनाथांच्या रूपाने आला आणि त्याने सर्व जनमानसाला हेलावून सोडले.

दोन नद्यांचा संगम होतो, पण त्यांच्या पाण्याचे प्रवाह संगमातसुध्दा वेगळे दिसतात...

पण श्रीसाईनाथांनी शिर्डी येथे एक आगळाच संगम घडवून आणला. दोन धर्मांचा संगम... दोन विचारांचा संगम. मुस्लीमांना मशिद पवित्र व हिंदूंना अग्नि पवित्र या दोन गोष्टी द्वारकामाई मशिदीत शिर्डी येथे पाहावयास मिळतात. खरोखर द्वारकामाई मशिदीत प्रवेश करताच मन एका आगळ्या आनंदाने भरून येते, मान लवते. आत्मिक समाधान लाभते, कारण कोणत्याही धार्मिक अहंकाराचा, कोणत्याही धार्मिक एककल्ली विचाराचा पगडा द्वारकामाईत प्रवेश करताक्षणीच नष्ट झालेला असतो. केवढे हे सामर्थ्य ! केवढे हे आश्चर्य !

मानवजात धर्मवेडी होऊन आपापसात स्वतःच्या धर्माची शिकवणं विसरून भांडत असताना साईनाथांनी सर्वधर्मीयांना माणसाला माणसातील व प्राणिमात्रातील आत्मा ओळखण्याची शिकवण प्रत्यक्ष कृतीने दिली.

आणि त्यांच्या या ज्वलंत कार्याने प्रभावित झालेले मानव ज्याप्रमाणे पावसाच्या जलधारा असंख्य जलबिंदूंच्या रूपाने धरणीवर पडतात, त्याप्रमाणे शिर्डी येथे येऊ लागले आणि हे सर्व धर्मीय एक होऊन नदीप्रमाणे वाहू लागले... धर्मनिरपेक्षतेच्या महान समुद्रास जाऊन मिळाले... मिळत आहेत.

ऐहिक सुखाचा लाभ श्रीसद्गुरूसाईनाथ महाराज तर देतीलच पण त्याच-बरोबर मी साईचरणी वारंवार विनंती करीन की शिर्डी येथील तुझ्या अनेक धर्मीय भक्तांचे दर्शन डोळ्यासमोर ठेवून, द्वारकामाईद्वारे तू आमच्या अंतःकरणात घडविलेला धार्मिक ऐक्यतेचा साक्षात्कार सतत राहू दे आणि यातूनच . . .

धर्मनिरपेक्ष असा, माणसाला कोणत्याही धर्माचा किंवा जातीचा विचार न करता केवळ माणूस म्हणून ओळखणारा, प्राणिमात्रातील आत्मा ओळखणारा असा मंगल भारत निर्माण होऊदे. धर्मनिरपेक्षतेचा आद्यप्रवर्तक श्रीसद्गुरू साईमहाराज हे नाव जगाच्या कोनाकोपऱ्यात सदैव दुमदुमत राहील यात शंका नाही.

.............

# मी साई भजनी कसा लागलो

–हेमंत प्रभाकर खेडेकर
अभ्युदय नगर, ३८/२७०६, मुं. ३३

● मी माझ्या आजोळी रहात असताना अंदाजे सन १९६०–६१ साली प्रथम माझ्या मामाने ( दशरथ वाढिवकर ) एके दिवशी सायंकाळी श्रीसाईनाथांची तसबीर आणली होती आणि त्या दिवसापासून आम्ही सर्व म्हणजे आजीकडचे श्री साईबाबांची पूजा, आराधना करू लागलो. परंतु लक्षात ठेवण्याजोगी गोष्ट म्हणजे घरातील सर्वजण साईंची मनोभावे सेवा करावयाचे. मीसुद्धा रोज संध्याकाळी साई-बाबांची आरती, अभंग म्हणायचो आणि एवढे प्रसन्न वातावरण असतानादेखील मी साईबाबांना समजू शकलो नाही की, अंतःकरणापासून पाहू शकलो नाही. तत्पूर्वी मी शिरडीस मामा, आजी समवेत ३–४ वेळा येऊनसुद्धा गेलो.

असो, आमच्या घरी फक्त एकच व्यक्ती श्रीसाईबाबांना जाणू शकली आणि तेव्हापासून तो आजपर्यन्त श्रीसाईबाबांची सेवा करीत आहेत. ते म्हणजे माझे वंदनीय मामा (रमाकांत वाढिवकर ) होत.

१९७३ साली एके दिवशी माझ्या जीवनात एक साईरूपी प्रकाश येऊ लागला. मी अंधारातून प्रकाशाकडे जाऊ लागलो आणि प्रकाशरूपी श्रद्धा श्रीसाई-

बाबांकडे झेपाऊ लागली. एक प्रकारची मनात ओढ निर्माण झाली, आनंद निर्माण झाला. मनःशांती मिळाली. तेव्हापासून मनाला अशी खंत वाटू लागली की, फार पूर्वीपासून जर मी माझ्या मनात साईबाबांची श्रद्धा ठेवली असती तर आज मला जेवढा आनंद, शांती मिळते त्याहून पुष्कळ अधिक पटीने मिळाली असती.

केव्हा केव्हा विचार येतात की, जर का माझ्या मामाने साईंची तसबीर आणली नसती, मला शिस्त लावली नसती तर मी खरोखरच एका सत्पुरुषास मुकलो असतो. एका विभूतीला अंतरलो असतो.

'साई'नामाची गोडी काय वर्णावी. 'साई' नाम घेताच वेगळाच आनंद मनाला मिळतो. वेगळीच गोडी लागते, नितांत आदर निर्माण होतो.

अशा ब्रम्हांडनायक साईबाबांस माझा शतशः अनंत प्रणाम.

'दास' म्हणे ग्रंथराजा । घेई माझी भाव पूजा ।।
सर्व काळ हृदयांत । राहो माझ्या साई राजा ।।

..............

श्रीसाईबाबांच्या वेळी ऐन तारुण्यात असलेले व आजचे ९२ वर्षे वयाचे खारचे प्रसिद्ध साईभक्त श्री. दिक्षीत यांची बाबांच्या आठवणीबद्दलची अत्यंत रंजक मुलाखत जून १९७७ अंकात वाचा

# श्रीसाईबाबांच्या अचाट सामर्थ्याविषयी आलेला एक अनुभव

### श्रीसाईबाबा—ए मॅन ऑफ मिरॅकल

—श्रीमती विजया सेलुकर
नं. १–१०३ अरेरा कॉलनी, भोपाळ

● एप्रील महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मी आजारी पडले होते. ३–४ दिवसाच्या तपानंतर एक दिवस दुपारी काही करमेना म्हणून एक पुस्तक वाचायला घेतले ज्या पुस्तकाचे नाव A Man of Miracle असे असून ते श्रीसत्यसाईबाबांच्या जीवनावर आधारलेले होते. त्यात बऱ्याच ठिकाणी श्रीसत्यसाईबाबा हे शिर्डीचे श्रीसाईबाबा ह्यांचाच अवतार आहेत असा उल्लेख केलेला असून त्याबद्दलचे भक्तांस असलेले पुष्कळ दृष्टांत दिलेले आहेत. भक्तांच्या संकटाच्या वेळी धावत येवून काहीतरी Miracle घडवून भक्तांची संकटातून क्षणात सुटका करतात म्हणून लेखकाने त्यांना A Man of Miracle असे उल्लेखिले आहे.

माझ्याहि मनात शिर्डीच्या साईबाबाबद्दल अपार श्रद्धा व भक्ति आहे व आपल्या भक्तांच्या मनोकामना ते खचित पूर्ण करतात असे ऐकले होते तेव्हा वाचता वाचता सहज मी मनात म्हटले की हे देवा, जर तू खरोखरच Man of Miracle ( मूळपुस्तक इंग्रजी भाषेत असल्यामुळे हा उल्लेख जसाच्या तसा केला आहे ) असशील तर माझ्याहि बाबतीत एक मिरॅकल घडवून दाखव व ते म्हणजे असे की आम्ही ज्या घरात पहिले राहत होतो ते घर सर्वच दृष्टीने खराब होते. तिथे रहात असताना आम्हाला कधीच शारीरिक व मानसिक शांति मिळाली नाही एवढेच नव्हे तर प्रत्येक येणारा देखील आम्हाला ते घर सोडण्याविषयी सल्ला देत असे परंतु इतरत्र सोय नसल्यामुळे त्याच घरात आम्ही ६–७ वर्षे काढली.

मध्यंतरीच्या काळात दुसरे घर मिळविण्यासाठी आम्ही सर्व प्रकारचे व्यावहारिक व दैवी उपाय करून थकलो होतो. 'दुसरे घर (सरकारी क्वार्टर) मिळण्यासाठी मी स्वतः सर्व प्रकारचे नवस, गुरुवार, शुक्रवार, शनिवार वगैरे देखील करून पाहिले पण काही फायदा झाला नाही तेव्हा अतिशय निराश अवस्थेत मी म्हटले 'देवा जर तू खरोखर Man of Miracle आहेस तर मग माझ्या बाबतीत हे मिरॅकल घडवून आण. तो दिवस बहुधा बुधवार होता. पुढच्या गुरुवारपर्यंत मला

नवीन क्वार्टर मिळवून दे आता जास्त दिवस वाट पाहायला लावू नकोस ' असे म्हणून थोड्या वेळाने पुस्तक बंद करून टाकले.

३० एप्रीलला मी शाळेत Join झाले व लगेच एक मेपासून आम्हाला २ महिन्याच्या सुट्ट्या लागल्या. २ मे ला सकाळी शाळेतील चपराशीण मला घरी बोलावण्यास आली व म्हणाली, 'बहेनजी, कोई तो भी आदमी एक कागज लेके आया है और आपको बुला रहा हैं।' नुकताच निकाल लागलेला असल्यामुळे तो कोणीतरी नापास झालेला मुलाचा पालक असावा असे मला वाटले कारण बुधवारच्या गोष्टीची मला त्यावेळेस बिलकूल आठवण नव्हती. म्हणून मी चपराशिणीला सांगितले की 'उनको कह दो कि वह घर में नही हैं' कारण तो पालक आपल्या मुलाला पास करवून देण्याचा आग्रह करेल असा माझा अंदाज होता. चपराशीण परत गेली व त्याला तोच निरोप सांगितला. शाळा अगदी घरासमोर असल्याने मला स्वयंपाकघराच्या खिडकीतून शाळेतला प्रकार दिसत होता. त्या माणसाने तिला माझ्या घराचा पत्ता विचारला व तो घरी येवू लागला. मी लगेच माझ्या मुलीला बाहेर पाठविले व म्हटलं की त्याला सांग-मम्मी घरपर नहीं है। तरीसुद्धा तो माणूस आतमध्ये खुर्चीवर येवून बसला व माझ्या सासऱ्यांना एक कागद दाखविला. तो नवीन क्वार्टरच्या अलॉटमेंटच्या ऑर्डरचा होता. त्यांनी घरात येवून मला तो कागद दाखवितांच खाडकन् मला माझ्या उद्गारांची आठवण झाली. डोळ्यावर विश्वास बसेना. मी लगेच ती ऑर्डर श्रीसाईबाबाच्या फोटोजवळ ठेवली व हात जोडून म्हटले की बाबा, तुम्ही खरोखरच मॅन ऑफ मिरॅकल आहांत. आज मला ह्याची खात्री पटली. ह्या अवधीत तो आलेला माणूस निघूनही गेला. त्याच्यासाठी चहासुद्धा करायला त्यानी मला वेळ दिला नाही. त्या माणसाला आम्ही कधीही पाहिले नव्हते किंवा त्याला भेटलो नव्हतो. तसेच तो माणूस चपराशिणीचा निरोप ऐकून जर परस्पर तसाच गेला असता तर मला ती ऑर्डर कधी निघाली होती हे कधीच कळले नसते. मला तर असे वाटते की मला प्रचीति देण्यासाठीच श्रीसाईबाबा त्या माणसाच्या रूपाने माझ्या घरी आले होते नाहीतर साधी तोंडओळखसुद्धा नसतांना कोण एवढी तसदी घेईल. आपल्या अखंड अस्तित्वाची जाणीव परमेश्वराने मला त्या दिवशी करून दिली व आनंदाची गोष्ट म्हणजे आम्हाला आता जे क्वार्टर मिळाले आहे ते इतकं सुंदर आणि छान आहे पहिल्यांचे येणारे सर्वच लोक ह्या घराची खूप तारीफ करतात. श्रीसाईनाथाच्या कृपेने घरात सर्वत्र मंगल वातावरण निर्माण झाले आहे. अशीच अखंड कृपेची पाखर आमच्यावर श्रीसाईबाबा सतत करोत हीच त्यांच्या चरणी प्रार्थना आहे. *

...............

# वाचकांचा पत्रव्यवहार

संपादक ' साईलीला ' यांना—

सप्रेम नमस्कार वि. वि.

आम्हांला आपल्याकडून जानेवारीपासून अंक नियमित येत आहेत. याबद्दल आपले आभार! सर्व अंक फारच रोचक वाटले. आवडले. आतील मजकूर सर्वतोपरी बरे वाटतात. फेब्रुवारीचा 'श्रीसाईकाव्य बहार' विशेषांक म्हणून आपण प्रसिद्ध केला तो अत्यंत विलोभीय वाटला. आनंद झाला. ह्या निमित्याने भक्तकवींना एक श्री साईचरणी काव्य पुष्प वाहण्यास नामी संधि मिळाली. त्याचप्रमाणे प्रत्येक काव्य पुष्पाचा सुगंध घेण्यास भावीक रसिकांना लाभ मिळाला. त्याबद्दल धन्यवाद.

आपले नम्र

**—श्री. एकनाथ एम्. मेस्त्री.**

**सौ. अरूणा ए. मेस्त्री**

म. गांधी रोड, गोरेगांव, मुंबई—४०००६२

सन्माननीय संपादक,

श्रीसाईलीला मासिक यांना—

सप्रेम नमस्कार, वि. वि.

महाशय,

आपण एप्रिल १९७७ चा श्रीसाईलीला मासिकाचा 'खास रामनवमी' विशेषांक प्रसिद्ध करून श्रीसाईबाबांची उत्कृष्ट सेवाच केली आहे असे मला वाटते. हा अंक अनेक दृष्टीने वैशिष्टयपूर्ण आहे. प्रभुरामचंद्राची कुंडली हा लेख प्रभूच्या मानवी रूपास धरून लिहिला आहे. 'प्रभाते मनी राम चिंतीत जावा' हा श्री. सदानंदजी चेंदवणकर यांनी लिहिलेला लेख भारताखेरीज जगातील इतर देशांतील रामकथेच्या प्रचाराची माहिती देतो. तर डॉ. गव्हाणकर यांचा लेख श्रीरामाचे दर्शन कसे घ्यावे हे दर्शवितो. श्री. आजगांवकराचा लेख, 'श्रीसाईरामाची रामकथा' हा सखोल असून अनुभवाच्या पंथात प्रवेश करवितो. डॉ. अनिल जायस्वाल व श्री. शाम जुवळे यांचे लेख प्रापंचिक माणसाना बोधप्रद असे आहेत. श्री. पाठक यांनी रहीम हा लेख लिहून परधर्मीयही श्रीरामावर प्रेम करतात हे दर्शविले आहे.

एकंदरीत हा खास अंक प्रसिद्ध करून मराठी वाङ्मयात उत्कृष्ट भर घालून श्रीसाईबाबांच्या सेवेत भर पाडल्याबद्दल धन्यवाद.

आपला नम्र,

**—अनंत जयदेव चितांबर**

**गीताभ्यास कार्यालय घर नंबर २०४**

**दिल्लीदरवाजाजवळ, अहमदनगर**

## साई साई

साई सद्गुरु, साई दत्तगुरु, साई कल्पतरु दीन भक्ता ।
साई सुखकर्ता, साई दुःखहर्ता, साई प्रियकर्ता सकलांचा ।
साई नामी गोडी, साई कथा ओढी, साई मंत्र जोडी मानवा रे ।
साई मृदु काया, साई शीतल छाया, साई स्पर्श व्हाया भाग्य हवे ।
साई चिंतामणी, साई सुख खाणी, साई साई वाणी, नाम जपा ॥

—सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन, बंदररोड, रत्नागिरी

## साईध्यान

साईचें चिंतन करी रात्र-दिन ।
वाऊगा तो क्षण जावो नेदी ॥१॥

चालता बोलता जेवण जेविता ।
सदा देता घेता साईध्यान ॥२॥

आसनी शयनी एकान्ती लोकान्ती ।
आठवी श्रीसाई अखंडीत ॥३॥

रघुनाथ म्हणे-नित्य साईचें दर्शन ।
तेणे समाधान परी पूर्ण ॥४॥

—रघुनाथ बाबुराव सांडभोर,
५७० दत्तवाडी, पुणे ३०

# साईनाथा पावना !

भक्त भोळा मी तुझा
साईनाथा पाव ना ॥ ध्रु ॥

धूप नाही दीप नाही
आहे फक्त भावना
साई तुझ्या दारी आलो
घेऊनि मी वेदना
साईनाथा पाव ना ॥ १ ॥

सोसाट्याचा वारा आणि
चिमुकला मी दिवा
भोळ्या भक्ता तारण्याला
तुच देवा धाव ना
साईनाथा पाव ना ॥ २ ॥

डोळ्या मधले अश्रु देवा
कैसे मी दावू कुणा
डोलणारी नाव माझी
तू तीराला लाव ना
साईनाथा पाव ना ॥ ३ ॥

—सुभाषचंद्र वैष्णव

सुशिल प्रकाशन, ६७, देसाईपुरा, नंदुरबार जि. धुळे

# साई भक्तांचा सुदिन

पाण्याने पणती पेटे
उदीने हरती संकटे
असा साई ज्यांसी भेटे
त्यांसी आकाश ठेंगणे

ज्यांसी नाही आसक्ती
त्यांसी देई शक्ती
साई ज्यावरी कृपा करी
भवपाशांतून त्यांसी उद्धरी

साई चरणीं अर्पितां मन
असो दुर्बल निष्कांचन
उजळूनि येई हो जीवन
साई भक्तांसाठी तोचि सुदिन !

—उज्वल वामनराव कुळकर्णी
८९६।१ तांबोळी गल्ली, नंदुरबार, जि. धुळे

## प्रभो साईनाथा

प्रभो साईनाथा
भक्तांना पावतो
म्हणूनी भजतो–मनोभावे

प्रभो साईनाथा
सर्वांठायी राहे
कृपागंगा वाहे–भक्तावरी

प्रभो साईनाथा
सर्वस्वाचा ठेवा
वेड लावी जिवा–म्हणुनिया

प्रभो साईनाथा
देई बा दर्शन
आलो मी शरण–तुजलागी

–रमेश डी. चव्हाण
'आनंद' साईनिकेतन, १९९ गुजरलेन, नागपूर जि. धुळे

## प्रेमांकुर

तुला पाहतां भान हरपले
आणि हरवले हृदय रे ॥१॥

तुझ्या दर्शना मन आतुरले
आणि आतुरले मन हे रे ॥२॥

बघता बघता तुझ्याकडे
दर्शना थबकले पाय रे ॥३॥

तुझे हास्य जणू भासे मजला
आशिष वाटे तो मजला रे ॥४॥

दोन जिवांचं मिलन झाले
प्रेमांकुर रुजले रे

–स. द. महाजन,
पाध्ये भुवन, जामदार मंदिर समोर, महाल, नागपूर.

# साईनामाचा महिमा

मुखे म्हणता साई साई
सर्व दुःख विलया जाई
आणिक घडे नवलाई
चित्त-वृत्ती मोहरती ॥१॥

मुखे होता साईचा गजर
चंचल मन ते होते स्थीर
माय-पाशहि हटती दूर
सहजगती ॥२॥

साई नामे मिळे आराम
साई नाम हे मोक्षधाम
साई नामे उध्दरती जन
भवसागरी ॥३॥

जन हो जावया मोक्षाचिया मंदीरा
साईनाथाची कास धरा
साईनाथाचा बोभाट करा
रात्रंदिन ॥४॥

— रामदास भाऊराव जोशी
क्वार्टर नं. टी–१९. सेंट्रल
स्कूल समोर, एअर फोर्स,
लोहोगांव. पुणे–३२

# मेरा भी नाम लिखना

साईं तुम्हारे भक्तों में मेरा भी नाम लिखना
हर जनम में बाबा मुझको करिब रखना
तेरा नाम लेनेवाला, है कामियाब होता
तेरी भक्ति करने वाला, अपना मकाम पाता
तेरी वंदना के सूर में, श्यामिल मुझे भी करना
साईं तुम्हारे भक्तों में, मेरा भी नाम लिखना
जीवन का राज क्या है, हम जानते नही है
सुख, दुःख की सबब क्या है, ये भी पता नही है
इतनाहि जानते हैं, तेरा नाम लेते रहेना
साईं तुम्हारे भक्तों में, मेरा भी नाम लिखना
आत्मा को शांती मिलती है, दरबार में आनेसे
हर रोज दूर होते है, समाधि के दरस से
काबिल मुझे बनादे मेरा सलाम लेना
साईं तुम्हारे भक्तों में मेरा भी नाम लिखना
हर जनम में बाबा मुझको करिब रखना

–जयवंत कुलकर्णी,
कुलकर्णी कुटीर, विवेकानंद पथ, विलेपारले.

## ब्रह्मानंद देई साईबाबा–

मंगल प्रभाती
होई काकडार्ती
दिशाही गर्जती–साई-साई ॥१॥

षोडषोपचारे
होई साई पूजा
नुरे भाव दुजा–साई पुढे ॥२॥

रात्रंदिन चाले
भजन कीर्तन
मुखा-मुखातून–साईपदे ॥३॥

शिर्डी संत गुरू
धावूनही येती
क्लेश ही मिटती–साईनामे ॥४॥

अगणित भक्त
प्रतिदिनी येती
विदेशीही ख्याती–साईथोर ॥५॥

मनोकामनाही
फलद्रुप होई
ब्रह्मानंद देई–साईबाबा ॥६॥

–प्र. अ. पुराणिक
एम्. ए. बी. एड,
देशमुखवाडा, कृष्णनगर, धुळे

# श्रीसाईनाथाची आरती

जयदेव जयदेव जय साईनाथा
ओवाळीतो आरती तुजला आता
योग-योगेश्वर तू जगन्नियंता
कैवल्यमूर्ती माझी तू साईनाथा
पाण्याने भरलेले दीप उजळीता
सिद्ध झालीरे तुझी दिव्यता
जयदेव जयदेव जय साईनाथा
ओवाळीतो आरती तुजला आता
तुझ्यापुढे धूनी पेटविता
फाकते तुझीच तेजस्विता
जयदेव जयदेव जय साईनाथा
ओवाळीतो आरती तुजला आता
राहो मुखांत तुझे नांव नाथा
टळो न द्यावा हा संकल्प माझा
जयदेव जयदेव जय साईनाथा
ओवाळीतो आरती तुजला आता
तुझ्यामुळे शिर्डीस आली मंगलता
धन्य शिरडी धन्य ती जनता
जयदेव जयदेव जय साईनाथा
ओवाळीतो आरती तुजला आता

–रमाकांत पंडित.
प्रभास्मृती, भाऊदाजी रोड,

# तू उमलला नसता तर

तू उमलला नसता तर
भारले नसते सुगंधाने--
विश्व आणि स्फुरले नसते
अंतरातही माझ्या गाणे

तू उमलला नसता तर
लता ओस पडल्या असत्या
आयुष्याच्या भांड्यात मात्र
अश्रू टिपित राहिल्या असत्या

तू उमलला नसता तर
भ्रमरांच्या भ्रमणात
काहीच स्वारस्य उरलं नसतं
दिव्यासाठी रडती वात

तू उमलला नसता तर
लाखो चिरडले असते जीव
अशा भेसूर तिमिरात
दिसली नसती तुझी शीव

तू उमलला नसता तर
पावित्र्याची शितल सर
धजली नसती येण्याला
वखवखलेल्या धरतीवर

तू उमलला नसता तर
सुकला असता गारवा
आणि झोपता घरट्यात
मुक्या जिवांचा रे थवा

—दे. शि. दुधलकर
प्लॉट नं. १८६ गणेशनगर, नागपूर

# अथ श्रीसाईनाथ कवचम्

अभीष्ट फलदं देवं सर्वज्ञं परमेश्वरम् ।
भक्त पराधीनं शान्तं प्रणमामि साईनाथम् ॥ १ ॥

प्रेमपदः शिरः पातु भालं पातु साईराजः ।
वासुदेवः कर्णौ पातु नेत्रे शुद्धसत्त्वस्थितः ॥ २ ॥

जिव्हां पातु लोकनाथो नासों मे भास्करप्रभः ।
मुखं पातु सिद्धेश्वरः कंठ मे पुरुषोत्तमः ॥ ३ ॥

स्कन्धौ सर्वाभीष्टप्रदः भुजौ पातु सुलोचनः ।
करौ साईनाथः पातु हृदयं चापद्बांधवः ॥ ४ ॥

नाभिं पातु नित्यानंदो मध्यं पातु सुखप्रदः ।
कटिं पातु सत्पुरुष ऊरू मे पातु महेशः ॥ ५ ॥

जानुजंघ सर्वात्मकः पादौ मनोवागतीतः ।
पातु प्रियोऽखिलं वपुः प्रणमामि योगेश्वरम् ॥ ६ ॥

इत्यतैत्कवचं दिव्यं यो नरो नित्यं स्मरेत् ।
सर्वान्कामानवाप्नोति सर्वत्र विजयी भवेत् ॥ ७ ॥

इति श्रीसाईनाथ कवचम्

रचनाकार : श्री. ल. म. तथा बापूजी रणदिवे बी. ए
तावडे बिल्डिंग, कुंभारवाडा, दादर, २८.

..............

—श्रीसाईलीला—
खास गुरुपौर्णिमा अंक
१ जुलै १९७७ रोजी प्रसिद्ध होणार
श्रीदत्तविषयक भरपूर साहित्य व कविता

# शिरडी--वृत्त माहे मार्च सन १९७७

## – रामनवमी उत्सव –

श्रीसाईनाथ महाराज यांचा श्रीरामनवमी उत्सव सालाबादप्रमाणे सोमवार दि. २८–३–७७ रोजी सुरू होऊन बुधवार दि. ३०–३–७७ रोजी समाप्त झाला. उत्सवाला जोडून गुरुवार आल्यामुळे गर्दी फार होती.

**उत्सवाचा १ ला दिवस :** सोमवार दि. २८–३–७७ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. ५–१५ वा. काकड आरती झाली. चैत्र शु॥ अष्टमीला पहाटे ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थानमार्गे श्रींचे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साईसच्चरित अध्याय वाचनास सुरुवात झाली. नंतर श्रींचे मंगलस्नान वगैरे नित्याचे कार्यक्रम सुरू झाले. दुपारी ४–३० ते ६–४५ पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले यांचे कीर्तन झाले. रात्री ७–३० ते ९ व ९–३० ते ११ पर्यंत सौ. निर्मला गोगटे मुंबई यांचा गायनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९–१५ ते १२ पर्यंत श्रींच्या पालखींची मिरवणूक, वाजंत्री, चौघडा सूरसनई, साईनाथ माध्यमिक विद्यालय बॅण्ड पथक, राहाता बॅण्ड पथक, भजन गायन अशा थाटात संस्थानचे लेझीम पथकसह वाजत गाजत मिरवणूक गावातून फिरून आली. स्थानिक मंडळीनी भारुड–गारुड कार्यक्रम केले. पुण्याचे कलाकार श्री. रघुनाथ बा. सांडभोर यांनी निरनिराळे वेष धारण करून नकलांचे कार्यक्रम केले. मुंबईतील कोळी महिलांनी नृत्य करून कार्यक्रमास शोभा आणली होती. अशा मोठ्या थाटात मिरवणूक आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :** मंगळवार दि. २९–३–७७ पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यापासूनच श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांच्या रांगा लागल्या होत्या. पहाटे ५–१५ वा. काकड आरती झाल्यावर ६ वा. श्रींच्या साईसच्चरित ग्रंथाची २४ तास वाचन चालू असलेली समाप्ती मिरवणूक गुरुस्थानमार्गे समाधि मंदिरात आली. सकाळी ६–३० वा. कावडी मिरवणूकीस प्रारंभ झाला. रिसीव्हर यांनी कावडीने आणलेल्या गोदावरी गंगेच्या पाण्याची पूजा केली व श्रीफळ अर्पण केल्यावर मिरवणूक गावातून फिरून आली. प्रत्येक कावडी धारकाने श्रींच्या समाधिस गंगेच्या पाण्याने स्नान घातले व दर्शन प्रसाद घेतला.

सकाळी १०ते १२-३० पर्यंत श्री. ह. भ. प. अनंतराव आठवले महाराज यांचे श्रीरामजन्मावरील कीर्तन झाले. सायंकाळी ५ ते ७ :पर्यंत श्रींच्या निशाणाची व रथाची मिरवणूक गावातून आल्यावर धुपारती झाली.

रात्री ८ वाजेपासून ते दुसरे दिवशी सकाळी ६ वाजेपर्यंत उपस्थित कलाकारांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. श्रींचे मंदिर साईभक्तांचे दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस** :- बुधवार दि. ३०-३-७७ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सामुदायिक अभिषेक पूजा झाल्यावर सकाळी १० वा. श्री. ह. भ. प. अनंतराव महाराज आठवले यांचे कालाकीर्तन सुरू झाले. कीर्तनास फारच गर्दी होती. शांत चित्ताने लोक कीर्तन ऐकत होते. श्रीयुत अनंतराव महाराज व श्रीयुत तुकाराम बुवा यांच्या फुगडया पिंगा चालू असता साईनामाचे गजरात दहीहंडी फोडण्याचा कार्यक्रम झाला. माध्यान्ह आरती झाल्यावर तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. रात्री ७-३० ते १० वाजेपर्यंत सौ. रजनी जोशी, मुंबई यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला. १० ते १०-३० शेजारती झाल्यावर तीर्थ प्रसाद वाटण्यात आला व उत्सव समाप्त झाला. या उत्सवाकरिता पूर्व तयारी म्हणून एक महिना अगोदर कोर्ट रिसीव्हर यांनी संस्थानचे सर्व खातेप्रमुखांची सभा घेऊन कामाची रुपरेषा आखून देऊन संस्थान कर्मचाऱ्यांच्या साह्याने उत्सव व्यवस्थित पार पाडला.

**गुढीपाडवा** :- गुढीपाडव्यानिमित्त श्रीसाईबाबांना महाअभिषेक करून मंदिराचे कळसाजवळ ध्वजारोहण करण्यात आले. सायंकाळी श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून आल्यावर रात्री हरिकीर्तन झाले.

काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे.

**कीर्तन** :- १) संस्थान गवई काव्यतीर्थ, श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तने नेहमीप्रमाणे झाली.

२) ह. भ. प. तुकारामबुवा आजेगांवकर.

प्रवचन :-१) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे शिर्डी.

२) ह. भ. प. जगन्नाथबुा वाघचौरे शिर्डी.

**गायन भजन** :-सौ. इंदिराबाई रा. केळकर, बांद्रा, मुंबई.

**वादन** :-२) श्री. विठोबा ता. लबदे, निमगाव ३) श्री. शिवाजी तु. धुमाळ, मुंबई. ४) श्री. गुरुदेव सेवा भजन मंडळ, वर्धा. ५) स्वरवंदना पार्टी :-श्री. जयवंत कुलकर्णी व कलाकार मुंबई. ६) श्री. जगदीश वैष्णव, पुणे. ७) ह. भ. प. विजयबाबा धंतोली, नागपूर. ८) श्री. कृष्णकुमार चौबे, नागपूर. ९) श्री. रामलक्ष्मण संगीतकार, मुंबई १६. १०) श्री. बाबुराव रूंजावराव, नाशिक. ११) श्री. सुधाकर ना. कामतेकर, मुंबई. १२) श्री. शास्त्रीजी इच्छा शंकर जोशी, मुंबई. १३) ह. भ. प. साईनाथ भजन मंडळ परळ, मुंबई. १४) श्री. भोलानाथ समेळ,मुंबई. १५) सौ. निर्मला गोगटे, मुंबई १६) श्री. तुकाराम शि. धुमाळ, शिर्डी. १७) श्री. कीर्तिकर, दादर मुंबई. १८) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. १९) श्री. बाबुराव अ. नरोडे, कोपरगाव. २०) श्रीराम सातर्डे-

कर, परेल, मुंबई. २१) सौ. नीला प्रभू, मुंबई. २२) श्री. प्रदीप वि. देशपांडे. २३) श्री. शंकरराव पवार, मुंबई. २४) श्री. शिरोडकर अ. वा. २५) श्री. शामसुंदर भेडा, संगमनेर. २६) श्री. अहमद पठाण २७) सौ. वैशंपायन शशिकला, नाशिक. २८) श्री. मधुकरराव वैशंपायन नाशिक. २९) श्री. नानासाहेब ओक. ३०) श्री. काशिनाथराव पाठक, कोकण. ३१) श्रीमती स्वाती करंदीकर. ३२) श्रीमती वर्षा गुजराथी. ३३) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती. ३४) श्री. पंडीत बाळकृष्णदास. ३५) सौ. सविता सु. गिजरे, शिर्डी. ३६) सौ. शरयु मराठे, शिर्डी. ३७) श्री. तुळशीदास खंडागळे, कोपरगाव. ३८) सौ. पुष्पा म. जोशी, नाशिक. ३९) श्री. अवचट प्र. भा. ४०) श्री. वसंत चांगले, नाशिक. ४१) श्री. लक्ष्मीकांत कापरे, शिर्डी. ४२) श्री. दत्तोबा जळगावकर, शिर्डी. ४३) स्वामी रामानंद, बेळगाव ४४) भजन मंडळ, कोपरगाव. ४५) श्री. काकडे अ.बा. नेवासा. ४६) श्री. मोहनकुमार कांबळे, पुणे. ४७) श्री. सुभाष कुळकर्णी, कोपरगाव. ४८) श्री. सुधाकर गो. मांजरेकर, चेंबूर, मुंबई. ४९) श्री. शिवराम बा. खंडागळे, ५०) सौ. अंजली विजय, पोहेगांव. ५१) सौ. मनीबाई, हैद्राबाद. ५२) श्री. हिंदळेकर पा. आ. रत्नागिरी ५३) श्री. ज्ञानेश्वर रा. वैद्य, शिर्डी ५४) श्री. अरुण पु. रानडे, कोपरगाव ५५) श्री. ज्ञानेश्वर विनायक साकुरी ५६) श्री. बाबुराव ता. वाडेकर, शिर्डी ५७) श्री. रत्नाकर ना. कोराटे, शिर्डी ५८) श्री. इ. शा. जोशी, मुंबई ५९) श्री. भिमराव बनसोड ६०) श्री. कोंडीबा किसन ६१) श्री. शेख नबाब अस्तगाव ६२) श्री. बाळा पिलाजी गुरव, शिर्डी ६३) श्रीमती लिलावती गुजराथी, शिर्डी ६४) श्रीमती रोशन खाडी, मुंबई ६५) श्री. राघुभाऊ सालकर, कोपरगाव ६६) श्री. सखाराम राघु सालकर, कोपरगाव ६७) श्री. रघुनाथराव नागरे, शिर्डी ६८) सौ. रजनीताई जोशी मुंबई. ६९) श्री. रमेश मोडक, मुंबई ७०) श्री. राणे, मुंबई ७१) श्री. पांडुरंग मुळे, माजरवाडीकर (कै. तुकाराम खेडकर लोकनाट्य) ७२) लेझीम संघ श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी.

**माननीयांच्या भेटी :—**

१) मा. श्री. शंकररावजी चव्हाण. मुख्यमंत्री-महाराष्ट्र राज्य.
२) मा. ,, एन जयरामन IAS. मॅनेजिंग डायरेक्टर मा. फे. एम. एस. मुंबई
३) मा. ,, विजयसिंग ठाकूर IAS. जिल्हाधिकारी, अहमदनगर
४) मा. ,, राणे चिफ इंजिनिअर, महाराष्ट्र
५) मा. ,, सुब्रम्हण्यम् निवडणूक अधिकारी महाराष्ट्र
६) सौ. कांटावाला (मा. श्री. आर. एस. कांटावाला राज्यपाल यांच्या पत्नी)
७) मा. श्री. बसाक IAS. जिल्हाधिकारी, नाशिक
८) ,, ,, डी. डी. साठे ICS. सेवानिवृत्त मुख्य सचिव, महाराष्ट्र.
९) ,, ,, बाळासाहेब भारदे. अ. भा. खादी ग्रा. मंडळ अध्यक्ष, महाराष्ट्र.

★

# श्रीसाईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

## श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांच्या प्रकाशनांच्या किंमती

| | | रु. पै. |
|---|---|---|
| (१) | श्रीसाई सच्चरित्र, (मराठी) | १५-०० |
| (२) | श्रीसाई सच्चरित्र, (इंग्रजी) | ६-२५ |
| (३) | श्रीसाई सच्चरित्र, (गुजराती) | ६-५० |
| (४) | श्रीसाई सच्चरित्र, (हिन्दी) | ७-२५ |
| (५) | श्रीसाई सच्चरित्र, (कानडी) | ४-२५ |
| (६) | श्रीसाई सच्चरित्र, (सिंधी) | १०-०० |
| (७) | गुजराती पोथी (शरणानंद) | ५-५० |
| (८) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (मराठी) | ०-२० |
| (९) | श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि, (गुजराती) | ०-३० |
| (१०) | दासगणूकृत ४ अध्याय, (मराठी) | ०-२५ |
| (११) | सगुणोपासना, (मराठी) | ०-२५ |
| (१२) | सगुणोपासना, (गुजराती) | ०-२० |
| (१३) | श्रीप्रधानकृत चरित्र, (इंग्रजी) | २-०० |
| (१४) | साईलीलामृत, (मराठी) | ४-७५ |
| (१५) | सचित्र साईबाबा, (चित्रमय संग्रह) | २-०० |
| (१६) | साईबाबा अवतारकार्य, (अ. य. धोंड) | २-५० |
| (१७) | शिर्डीचे श्रीसाईबाबा, (के. भ. गव्हाणकर) | ५-०० |
| (१८) | शिर्डी दर्शन (६६ चित्रांचा संग्रह) | २-०० |
| (१९) | मुलांचे साईबाबा, (मराठी) | ०-७५ |
| (२०) | मुलांचे साईबाबा, (गुजराथी) | १-०० |
| (२१) | चिल्ड्रेन्स साईबाबा, (इंग्रजी) | १-२५ |
| (२२) | मुलांचे साईबाबा (तेलगु) | १-५० |
| (२३) | साई किर्तनमाला, (मराठी) | २-२५ |
| (२४) | साई दी सुपरमन, ले. स्वामी साई शरणानंद, (इंग्रजी) | ३-२५ |
| (२५) | श्रीसाई रूद्राध्याय, (मराठी) | ०-०५ |
| (२६) | श्रीसाई गीतांजली, (मराठी) | ०-०५ |
| (२७) | गाईड टु शिर्डी, (इंग्रजी) | ०-१० |
| (२८) | श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र, ( मराठी व इंग्रजी ) | |
| | वार्षिक वर्गणी, | ६-०० |
| | प्रत्येक प्रत | ०-६० |